


शिक्षण प्रसारक मंडळाचे

# स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली

www.spmtmchikhali.ac.in
Email. spmtmchikhli@gmail.com

!! विद्या परं दैवतम् !!

शिक्षण प्रसारक मंडळाचे

# स्व.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली.जि.बुलडाणा.

# विद्या

वार्षिकांक - २०२५-२६

मुख्य संपादक



प्राचार्य डॉ.सुभाष ज्ञा.गव्हाणे

कार्यकारी संपादक



प्रा. डॉ.विजय कुं. वाकोडे


जन-गण-मन अधिनायक जय हे,
भारत भाग्य विधाता!
पंजाब-सिन्धु-गुजरात-मराठा,
द्राविड़-उत्कल-बंग
विंध्य हिमाचल यमुना गंगा,
उच्छल जलधि तरंग
तब शुभ नामे जागे,
तब शुभ आशिष मांगे
गाहे तब जय-गाथा।
जन-गण-मंगलदायक जय हे,
भारत भाग्य विधाता!
जय हे! जय हे! जय हे!
जय जय जय जय हे!
resanskrit.com

# भारताचे संविधान

## प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्यांच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता,
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधान सभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत: प्रत अर्पण करीत आहोत.



# संपादकीय.....

**" ज्ञान हे केवळ परीक्षेत गुण मिळविण्याचे साधन नसून, व्यक्तिमत्त्व घडविण्याची आणि समाजाच्या परिवर्तनाला दिशा देण्याची शक्ती आहे."**

प्रिय विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकवृंद आणि "विद्या"च्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार!

महाविद्यालयाचा वार्षिकांक "विद्या" आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद आणि समाधान वाटत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ हे आपल्या महाविद्यालयाच्या वाटचालीतील आणखी एक महत्त्वपूर्ण पर्व आहे. वर्षभरात महाविद्यालयात घडलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक आणि सर्जनशील उपक्रमांचे प्रतिबिंब "विद्या"च्या या अंकातून अनुभवायला मिळणार आहे.

"विद्या" हा केवळ काही लेख, कविता, चारोळ्या, छायाचित्रे आणि कार्यक्रमांच्या अहवालांचा संग्रह नाही. तो आपल्या महाविद्यालयाच्या एका संपूर्ण वर्षाच्या प्रवासाचा आरसा आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील विचार, भावना, कल्पना, स्वप्ने आणि प्रतिभेला अभिव्यक्ती देणारे हे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या साहित्यकृतींबरोबरच प्राध्यापकांचे वैचारिक व शैक्षणिक लेख या अंकाला वैचारिक समृद्धी प्रदान करतात.

आजचे युग वेगाने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल तंत्रज्ञान, जागतिकीकरण, बदलती रोजगारव्यवस्था आणि नव्या कौशल्यांची गरज यामुळे शिक्षणाचे स्वरूपही बदलत आहे. या बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्यावर समाधान न मानता ज्ञान, कौशल्य, सर्जनशीलता, चिकित्सक विचार, संवादकौशल्य, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी या गुणांचा विकास करणे आवश्यक आहे. शिक्षणाचा खरा उद्देश सक्षम, संवेदनशील, विवेकी आणि जबाबदार नागरिक घडविणे हा आहे.

महाविद्यालयातील विविध विभागांनी वर्षभर विविध व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, संशोधनपर उपक्रम आणि इतर विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रमांचे आयोजन केले. या सर्व उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना वर्गातील ज्ञान प्रत्यक्ष अनुभवाशी जोडण्याची संधी मिळाली. "विद्यापीठीन शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर जीवनाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी निर्माण करणारी प्रक्रिया आहे," या विचाराने आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत.

या अंकातील विद्यार्थ्यांच्या लेखनातून त्यांची कल्पनाशक्ती, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव प्रकर्षाने जाणवते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष प्रतिभा दडलेली असते. त्या प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळणे गरजेचे आहे. "विद्या" हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना "माझा विचार महत्त्वाचा आहे आणि तो समाजासमोर मांडण्याची क्षमता माझ्यात आहे" असा आत्मविश्वास देईल, असा मला विश्वास वाटतो.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी परिश्रम घेणाऱ्या संपादक मंडळाचे, प्राध्यापकांचे, विभागप्रमुखांचे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आणि विशेषतः आपल्या विद्यार्थी लेखकांचे* मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या कल्पकतेमुळे आणि अथक परिश्रमामुळे "विद्या"चा हा अंक अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण झाला आहे.

प्रिय विद्यार्थ्यांनो,

स्वप्ने मोठी ठेवा, प्रश्न विचारा, नवनवीन गोष्टी शिका, अपयशातून धडा घ्या आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करा. आपल्या प्रत्येक यशामागे महाविद्यालयाचा आणि आपल्या शिक्षकांचा आनंद दडलेला आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वातील उत्तम गुणांचा विकास करून आपण स्वतःची, आपल्या कुटुंबाची, महाविद्यालयाची आणि देशाची प्रतिष्ठा वाढवाल, याची मला खात्री आहे.

"विद्या"च्या या अंकातील प्रत्येक पान विद्यार्थ्यांच्या आठवणी जपणारे, विचारांना चालना देणारे आणि नव्या स्वप्नांना प्रेरणा देणारे ठरो, हीच सदिच्छा.

"ज्ञानातून विचार, विचारातून कृती आणि कृतीतून परिवर्तन" या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून आपण पुढील वाटचाल करूया.

"विद्या"च्या या अंकासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**डॉ.सुभाष ज्ञा.गव्हाणे,**
एस.पी.एम. महाविद्यालय चिखली जिल्हा बुलढाणा

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख,चारोळी, कविता, अहवाल | लेखक तथा समन्वयक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | सहकारातून नवभारताची निर्मिती | कु. लक्ष्मी शिंदे | ३ |
| ०२ | एकात्म मानव दर्शनाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय | डॉ. केदार अ. ठोसर | ४ |
| ०३ | विस्मृतीच्या पडद्याआड गेलेले चार वीर | कु. शुभांगी जाधव | ६ |
| ०४ | मराठी अभ्यास मंडळ अहवाल | डॉ. प्रफुल्ल उ. गवई | ७ |
| ०५ | माजी विद्यार्थी मेळावा | डॉ. विजय कुं. वाकोडे | ७ |
| ०६ | विद्यार्थी विकास मंडळ | डॉ. सुभाष ग्या. राऊत | ८ |
| ०७ | शारीरिक शिक्षण विभाग अहवाल | डॉ. उल्हास वि. ब्रम्हे | १० |
| ०८ | इतिहास अभ्यास मंडळ | डॉ. सुरेश सं. माळशिखरे | ११ |
| ०९ | जयंती व पुण्यतिथी अहवाल | प्रा. मनिष उ. पालवे | १२ |
| १० | सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल | डॉ. विजय कुं. वाकोडे | १३ |
| ११ | राष्ट्रिय सेवा योजना अहवाल | डॉ. बाळकृष्ण स. इंगळे | १४ |
| १२ | ग्रंथालय व माहितीशास्त्र | डॉ. प्रदिप हि. बारड | १७ |
| १३ | अर्थशास्त्र व नियोजन मंडळ | डॉ. दिलीप पां. महाजन | १९ |
| १४ | पर्यावरणशास्त्र व नेचर क्लब | डॉ. सतिश ज्ञा. मोरे | २१ |
| १५ | राज्यशास्त्र अभ्यास मंडळ | डॉ. नागेश खु. गायकवाड | २२ |
| १६ | वाणिज्य विभाग अहवाल | डॉ. अनिल स. पुरोहित | २३ |
| १७ | अँटिरॅगिंग, महिला लैगिंक छळ व प्लेसमेंट अँड करिअर कौन्सीलिंग सेल | डॉ. उल्हास वि. ब्रम्हे | २६ |
| १८ | महिला सक्षमीकरण कार्यशाळा, निबंध स्पर्धा व दिक्षांत समारंभ अहवाल | डॉ. प्रफुल्ल उ. गवई | २७ |
| १९ | IQAC अहवाल | डॉ. नागेश खु.गायकवाड | २८ |
| २० | पालक संपर्क समिती व पालक मेळावा अहवाल | डॉ. दिलीप पां.महाजन | २९ |
| २१ | पुरस्कार व शिष्यवृत्ती अहवाल | डॉ. दिलीप पां. महाजन | ३० |
| २२ | मुक्त विद्यापीठ अहवाल | डॉ. नागेश खु. गायकवाड | ३१ |
| २३ | मतदान जनजागृती गीत | डॉ. विजय कुं. वाकोडे | ३१ |

## सहकारातून नवभारताची निर्मिती

'एकमेका साह्य करू' अवघे धरू सुपथ'या संत तुकारामांचा उक्तीप्रमाणे सहकारही भारताच्या संस्कृतीची आणि प्रगतीची मूळ पाया भरणी आहे. आजचा भारत हा एका नव्या उजेडाकडे, महासत्तेकडे वाटचाल करत हा एका नव्या उजेडाकडे, महासत्तेकडे वाटचाल करत आहे.

या'नवभारताच्या'निर्मितीमध्ये सहकार क्षेत्राचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांती घडवून आणणारा ठरत आहे. सहकार म्हणजे केवळ एकत्र येऊन व्यवसाय करणे नव्हे, तर समाजातील शेवटचा घटकाला सोबत घेऊन सर्वांगीक विकास साधने होय.

भारतासारखे विकसनशील आणि कृषीप्रधान देशात सहकाऱ्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था ला नवजीवन दिले आहे. स्वातंत्र प्राप्तीनंतर देशात दूध पूर साखर कारखाने सुक्त गिरण्या आणि सहकारी बँकांचा माध्यमातून ग्रामीण भागात मोठे परिवर्तन झाले अमूल (AMUL) सारख्या सहकारी चळवळीने भारताला जगात सर्वाधिक दूध उत्पादन देश बनवले . हीच सहकाराची खरी ताकद आहे. जिथे सामान्य शेतकरी आणि पशुपालक एकत्र येऊन जागतिक पातळीवर क्रांती घडवून शकतात.

नवभारताची निर्मिती करताना देशासमोर आर्थिक विषमता दूर करणे आणि प्रकरणांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे ही मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांवर सहकार हा एक उत्तम उपाय आहे. केंद्र सहकार 'सहकारातून समृद्धी'हा ध्यास घेऊन स्वतंत्र 'सहकार मंत्रालय' स्थापन केले आहे. यामुळे या क्षेत्रात नवीन दिशा आणि आधुनिक मिळाले आहे. (PACS) डिजिटल एजंट करून त्यांना स्टेट जोडेल जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल.

आजचा नवभारत हा तंत्रज्ञान आणि नमावक्रमाचा (Innovatio) भारत हा त्यामुळे सहकार क्षेत्रातील आता आधुनिकतेची जोड दिली जात आहे. सेंद्रिय शेती, सोलर ऊर्जा ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर आणि महिला बचत गटाच्या जाळे या सर्व गोष्टी आता सहकारी तत्व वर पुढे येत आहेत. देशातील करोडो महिला'लिज्जत पापड किंवा स्थानिक 'बचत 'कटाचा माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत ही महिला शक्ती नव भारताच्या मुख्य आधारस्तंभ आहे. सहकारी चळवळीत काही आव्हाने नक्कीच आहे. तसे की राजकीय हस्तक्षेप, गैरव्यवहार आणि अपूर्व व्यवस्थापन. परंतु करून या आव्हानांवर मात केली जात आहे.

जेव्हा सहकारामध्ये प्राथमिकपणा आणि आधुनिक व्यवस्थापन एकत्र येईल. तेव्हा खऱ्या अर्थाने, आत्मनिर्भर भारताची स्वप्न पूर्ण होईल. शेवटी एवढेच म्हणेल म्हणेल भारताची निर्मिती ही कोणा एका व्यक्तीची किंवा सहकाराची जबाबदारी नाही. ती देशातील 144 कोटी जनतेची सामूहिक जबाबदारी आहे. 'सहकार'हाच तो मार्ग आहे झोप भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही मधील सुवर्णामध्ये साधून प्रत्येकाला प्रगतीची समान संधी देतो.

सहकाराची ही चळवळ जितकी मजबूत होईल. तितकाच आपल्या 'नवभारत'अधिक समृद्ध, शक्तिशाली आणि स्वावलंबी बनेल.

**कु. लक्ष्मी शिंदे (11 वी कला)**

### " माझा देश : काल, आज आणि उद्या..."

मज अभिमान माझ्या मातीचा, इतिहास येथे शौर्याचा,
जिथे शिवबांचे तलवारीचे पाते, आणि सत्याचे जोडले नाते.
जरी विविध जाती अन विविध धर्म, तरी देशसेवा हेच आमचे कर्म,
तिरंग्याच्या त्या तीन रंगात, गुंफले आहे भारताचे मर्म.
पण आजचा तरुण विचारतो स्वतःला कायदिले मी माझ्या देशाला?
भ्रष्टाचार, गरिबाच्या या अंधारात, मी कधी आणणार प्रकाश नवा?
आता उठू या, तरुण आपण, करूया देशाचे प्रगतीचे स्वप्न पूर्ण,
केवळ भाषणात नाही, तर कर्तृत्वात, घडवूया नवा भारत या जगात.
उद्याचा सूर्य आमचा असेल, माझा देश जगात सर्वात उंच असेल,
हातात हात घेऊन चालत राहू, भारताचे नाव विश्वात गाजवू!

**स्नेहल राजेंद्र लहाने,**
**प्रथम वर्ष वाणिज्य**

### कविता

जर तुम्हाला सूर्यासारखे चमकायचे असेल तर
प्रथम सूर्यासारखे जळावे लागेल,
जर खरंच आपल्याला यशस्वी व्हायचे असेल,
तर त्यासाठी अथक, निरंतर आणि हुशारीने
परिश्रम करावे लागेल.
स्वतःला झिजावे लागेल.

**कु.लक्ष्मी शिंदे,**
**11 वी कला**

### चारोळी

काजवे लुकलुकतात म्हणून तारे होत नाही
सूर्य एकच असतो, सारेच होत नाहीत.

**कु. प्राची हिवाळे**
**प्रथम वर्ष वाणिज्य**

## एकात्म मानव दर्शनाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय विचार आणि संस्कृतीच्या आधारावर आजही मानवतेला सुखी - समाधानी ठेवू शकेल अशा तत्व ज्ञानाची मांडणी केली. एकात्म मानव दर्शन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विचारांच्या मांडणीला साठ वर्ष पूर्ण झाले. तरी आजही हे विचार 21 व्या शतकातील भारतासाठी आणि जागतिक शांततेसाठी उपयोगी आहेत.

साध्या पद्धतीने राहणाऱ्या दीनदयाळजींना पंडित ही पदवी लोकांनी स्वतः हून प्रदान केली. ते शरीराने आपल्याला सोडून गेले, तरी आजही पंडित दीनदयाळ उपाध्याय, त्यांच्या कार्याने, विचारांनी आणि एकात्म मानव दर्शन या तत्त्वज्ञानाच्या रूपाने प्रभावीपणे जिवंत आहेत. गेल्या दशकात त्यांचे एकात्म मानव दर्शन, 'राष्ट्र जीवनाची दिशा' या पुस्तकातील विचार, त्यांनी मांडलेली अंत्योदयाची संकल्पना यावर विचारवंतांमध्ये मोठे विचार मंथन सुरू आहे. काही शासकीय योजनांचे नामकरण त्यांच्या नावाने झाल्यामुळे सर्वसामान्य लोकांपर्यंत सुद्धा हे नाव आता पोहोचले आहे. परंतु त्यांचे जीवन आणि त्यांचे कार्य मात्र फार कमी लोकांना माहित आहे.

२५ सप्टेंबर, १९१६ रोजी सूर्योदयाच्या शुभ वेळी 'दीना' या नावाने लहानपणी घरात ओळखल्या जाणाऱ्या बालकाचा जन्म झाला. आई रामप्यारी आणि वडील भगवतीप्रसाद यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या अगदीच सामान्य, किंवा खरंतर गरीबच होते. परिस्थितीचे लागोपाठ आघात दीनदयाळ वर झाले. तीन वर्षांचा असताना, त्याच्या वडीलांचे अचानक निधन झाले. या धक्क्यामुळे आईची तब्येतही बिघडत गेली. क्षयरोग होऊन चार वर्षानंतर आईचेही निधन झाले. त्यानंतर दीनदयाळ यांचे संगोपन मामा राधारमण यांनी करून दीनदयाळ च्या शालेय शिक्षणाकडे लक्ष दिले. परंतु याच दरम्यान त्यांचा अतिशय प्रिय लहान भाऊ शिवदयाळ याचा टायफाईड ने मृत्यू झाला. इतकी प्रतिकूलता असूनही, इतक्या मृत्यूंचे धक्के पचवून दीनदयाळ अभ्यास करत होता. आजच्या सारख्या सुविधा त्या काळात नव्हत्या. सोबतच मामाचे उत्पन्नही साधारणच होते. त्यामुळे दीनदयाळ ला त्याच्यासोबत शिकणाऱ्या मामाच्या मुलाच्या पुस्तकांवर रात्रीच्या वेळी अभ्यास करावा लागत असे. पण याची तक्रार, किंवा कोणतेही भांडवल न करता दीनदयाळ मन लावून आपला अभ्यास करत होता. त्याच्या कुशाग्र बुद्धीमुळे आणि प्रचंड परिश्रमामुळे त्या काळाच्या मॅट्रिकच्या परीक्षेत तो शाळेतून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. गणित हा त्याचा आवडता विषय होता. त्यातील भूमितीची दीनदयाळ ची उत्तर पत्रिका आदर्श उत्तरपत्रिका म्हणून अजमेर बोर्डात जपून ठेवण्यात आली होती.

या दरम्यानचा एक प्रसंग दीनदयाळजींची विचार करण्याची पद्धत प्रकर्षाने दाखवून देतो. सिकरच्या राजांना या हुशार विद्यार्थ्याची माहिती मिळाली. त्यांनी दीनदयाळ ला दरबारात बोलवून त्याचे कौतुक करत विचारले, " बक्षीस म्हणून तुला काय देऊ?" महाराजांना आश्चर्यचकित करणारे उत्तर मिळाले, "मला फक्त तुमचा आशीर्वाद द्या." महाराजांचे आशीर्वाद तर मिळालेच, सोबत एक सुवर्णपदक आणि पुढच्या अभ्यासासाठी विद्यावेतन प्राप्त झाले. पुढील सर्व शिक्षण हे साधारणतः शिष्यवृत्ती वरच दीनदयाळांनी पूर्ण केले.

दीनदयाळ हे स्वतः केवळ हुशार होते एवढेच नाही, तर शालेय जीवनापासूनच ते इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासात मदत करत. महाविद्यालयात तर त्यांनी एक वैशिष्ट्यपूर्ण मंडळ तयार केले, ज्याचे नाव 'शून्य मंडळ' असे ठेवले. अनेक अनुत्तीर्ण झालेल्या किंवा अनुत्तीर्ण होण्याची भीती असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यामुळे इंटरच्या परीक्षेत उत्तीर्ण होता आले. त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचे कामही या शून्य मंडळाने केले. इतरांना मदत करून सुद्धा इंटरच्या परीक्षेत दीनदयाळ सर्वाधिक गुणांचा विक्रम करत प्रथम क्रमांकाने गुणवत्ता यादीत झळकले. त्या पिलानी संस्थेचे प्रमुख, आघाडीचे उद्योजक घनश्यामदास बिर्ला यांनी त्यांना सुवर्णपदक प्रदान केले. सोबतच त्यांच्या संस्थेत एक चांगली नोकरी देऊ केली. परंतु पुढील शिक्षण घेण्याचा विचार पक्का असल्यामुळे, अतिशय नम्रपणे दीनदयाळजींनी ती संधी नाकारली. त्यांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. पुढे त्यांनी अविवाहित राहून संपूर्ण जीवन संघ कार्य आणि समाजासाठी व्यतीत केले.

भारतीय चिंतनातून अभ्यासपूर्वक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानव दर्शनाची मांडणी केली. हे त्यांचे विचारवंत म्हणून दीर्घ काळ टिकणारे आणि आजही भारत आणि मानवतेला उपयोगी ठरेल असे योगदान आहे. 'एकात्म' हा शब्द दीनदयाळजींचे द्रष्टेपण दाखवते. एकात्म भावात जीवनाचे ऐक्य, तादात्म्य, समरसता, सामंजस्य, परस्पर पूरकता हे सगळे भाव समाविष्ट होतात. व्यक्ती, समाज आणि निसर्ग तिघेही परस्परानुकूल आहेत. परंतु केवळ व्यक्तीकेंद्रित विचार केल्यामुळे पश्चिमेत, पाश्चात्य देशांमध्ये आदर्शांचा संघर्ष झाला. आमच्या समाजात परस्पर संघर्ष नाही तर सहयोगाची शिकवण देण्यात आलेली आहे. ती अंगीकारून आम्ही संपूर्ण मानव जातीला आणि या पृथ्वीला सुखी करू शकतो.

१९६५ च्या दरम्यान साम्यवादी तत्त्वज्ञानाचे आकर्षण जगभरामध्ये होते. भांडवलशाहीचे दोष समोर आणून आणि त्यांचा विरोध करून जगभरातील कामगार वर्गाला एकत्रित करण्याची घोषणा साम्यवादाने केली. परंतु त्यामुळे जगभरातील मनुष्यमात्र एक आहे, या महत्त्वाच्या तत्त्वाच्या विरोधात आणि एक प्रकारे फुटीर

चळवळ कम्युनिझमने सुरू केली. व्यक्तीला केवळ अन्न, वस्त्र, निवारा मिळाल्याने किंवा कृत्रिम समानता राज्य व्यवस्थेच्या बळाने निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. परंतु थोड्याच वर्षात व्यक्तीचे समाधान आणि प्रगतीची प्रेरणा कमी झाल्याचेही त्यांना लक्षात आले. याबाबत तसेच साम्यवादी देशातील समाज जीवनाबाबत अतिशय परखड मत दीनदयाळजींनी व्यक्त केले आहे:-

" साम्यवादी देशातील समाज जीवनाचा विचार केल्यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधातील त्या देशांचे व्यवहार कसे आहेत हेही पाहण्यासारखे आहे. रशिया व चीन यांच्यामध्ये साम्यवादाचे वास्तविक स्वरूप व त्यांची वाटचाल या प्रश्नावरून तात्विक मतभेद असले तरी आंतरराष्ट्रीय राजकारणातील वाटचालीची दोघांचीही दिशा एकाच प्रकारची आहे. एका वाक्यात सांगायचे झाले तर दोघेही कट्टर साम्राज्यवादी आहेत. पंचशील च्या घोषणा करीत चीन संपूर्ण तिबेट आणि भारताचा बराच भू भाग गिळंकृत करून बसलेला आहे, तर रशियाचे रणगाडे पोलंड, हंगेरी मधील आपली कामगिरी (!) उरकून आता त्यांनी अफगाणिस्तानात आपली मोर्चेबंदी केली आहे." ( पं दीनदयाळ उपाध्याय विचारदर्शन खंड दोन ,पृ.१८४-८५)

आपण सध्या २१ व्या शतकात देखील चीन आणि रशियाची साम्राज्यवादी भूमिका पहात आहोत. त्यामुळे 'जगभरातील मजूर एक' असे सूत्र अगदी दूर दूर पर्यंत कुठेही साम्यवादात आपल्याला पहावयास मिळत नाही. भांडवलशाहीच्या मार्गावर चाललेल्या अमेरिकेची जगातील अवास्तव दादागिरी सुद्धा आपण पहात आहोत.

१९६५ या वर्षात दीनदयाळजींनी या सर्व स्थितीचा विचार करून आपले तत्त्वज्ञान थोडक्यात मांडले. त्या मांडणीला आता साठ वर्ष पूर्ण झाले असून त्याबाबत या हिरक महोत्सवात विविध स्तरांवर चर्चा सुरू आहेत.

भारतीय आणि पाश्चात्य विचारातील फरक  पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये मानवी शरीर, मन आणि बुद्धी याचाच विचार शेकडो वर्ष केला गेला. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये मनुष्य म्हणजे शरीर, मन, बुद्धी आणि महत्त्वाचे म्हणजे आत्मा अशा चार घटकांचे संतुलित अस्तित्व मानले गेले आहे. या आत्म्याच्या अस्तित्वासंबंधी भारतीय विचारांबद्दल जगात वेळोवेळी अविश्वास दाखवण्यात आलेला आहे, तसेच त्यावर टीकाही केली गेली आहे. परंतु विश्व आरोग्य संघटनेने (World Health Organization - WHO) माणूस नावाच्या अस्तित्वाच्या व्याख्येत फिजिओलॉजी कली, सायकॉलॉजीकली, इंटेलेक्चुअली आणि स्पिरिच्युअली आकाराला येणारे अस्तित्व म्हणजे माणूस , असा उल्लेख केला आहे. यामधील Spirituality म्हणजेच अध्यात्मिकता ही कुठेतरी आत्म्याच्या अस्तित्वाच्या दिशेने जाते.

पाश्चात्य विचार पद्धतीत व्यक्ती केंद्रबिंदू आहे आणि मग परिवार, समाज, देश, विश्व  अशी रचना दिसते. परंतु यातील सर्व वर्तुळे  स्वतंत्र आहेत. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये विविधतेला स्वीकारले असून विविधतेतून एकतेकडे जाण्याचा प्रयत्न महत्त्वाचा मानला गेला आहे. ही विविधता व्यक्तीप्रमाणेच कुटुंब, समाज, राष्ट्र किंवा देश यामध्ये सुद्धा असते. असे असले तरी व्यक्ती ते परमेष्टी पर्यंत सर्व घटक   मंडलाकार रचनेमध्ये एकमेकांशी जोडलेले आहेत, असे नक्की लक्षात येते. किंबहुना कुटुंबाचा एक घटक व्यक्ती  हे सर्वात छोटे आणि परमेष्टी हे सर्वात व्यापक असे प्रगतीचे मापक मानले गेले आहे. आणि म्हणूनच प्राचीन काळापासून एका संस्कृत श्लोकाप्रमाणे व्यक्तीने कुटुंबासाठी, कुटुंबाने गावासाठी, गावाने राज्यासाठी (देशासाठी) आणि राज्याने विश्वासाठी अर्थात विश्व कल्याणासाठी त्याग करावा अशी अपेक्षा आणि मान्यता भारतामध्ये आहे.

१९६५ च्या मुंबई भाषणमालेचा समारोप करताना पंडित दीनदयाळजींनी जवळजवळ हेच विचार पुढील शब्दात व्यक्त केले . ते म्हणाले होते :-" गेल्या चार दिवसात आपण मानवतेचा समग्र व संकलित स्वरूपात विचार केला. आपण हे तात्विक विवेचन केले. आपण राष्ट्राला बलशाली, समृद्ध व सुखी बनविण्याचा संकल्प केला आहे, म्हणून या वैचारिक अधिष्ठानावर आपल्याला राष्ट्र पुनर्रचनेचे कार्य करावयाचे आहे. आपण आपल्या प्राचीन संस्कृतीचा विचार केला, परंतु आपल्याला काही एखाद्या पुरातत्व संग्रहालयाचे पहारेकरी बनावयाचे नाही. आपले ध्येय संस्कृतीचे रक्षण करणे एवढेच नसून, तिला गती देऊन कार्यक्षम बनविणे हे आहे. आपल्याला असा भारत उभा करावयाचा आहे की जो आपल्या पूर्वजांच्या भारताहून अधिक गौरवशाली असेल आणि येथे जन्मलेला प्रत्येक मनुष्य स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करीत केवळ सबंध मानव जातीशीच नव्हे तर संपूर्ण सृष्टीबरोबर एकात्मतेचा साक्षात्कार करीत नराचा नारायण बनण्यास समर्थ होईल."

भारताच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अंत्योदयासाठी म्हणजेच अंतिम व्यक्तीच्या प्रगतीसाठी 'हर हाथ को काम हर खेत को पानी' आवश्यक असल्याचे दीनदयाळजींनी वारंवार सांगितले होते. त्यामुळेच रोजगार मेळावे, विविध कृषी विकास योजना यांना वर्तमान सरकारने दीनदयाळ उपाध्याय यांचे नाव दिले आहे. सामाजिक स्तरावरही याच विचारांच्या आधारावर काही प्रकल्प अनेक वर्षांपासून सुरू आहेत. यामध्ये भर पडणे, तसेच समाजातील सेवाभावी व्यक्ती आणि संस्थांनी दीनदयाळजींच्या विचारांवर अधिक जोमाने काम केल्यास देशात प्रत्येक व्यक्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने सार्थक प्रगती होईल, हे निश्चित. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन!

**प्रा.डॉ. केदार ठोसर**
( एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव विद्यापीठ समिती तसेच
बुलढाणा जिल्हा शासकीय समिती सदस्य,पंडित दीनदयाळ उपाध्याय चरित्राचे लेखक)

## विस्मृतीच्या पडद्याआड गेलेले चार वीर

**प्रस्तावना :-** "तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा" हे नेताजींचे वाक्य आपण ऐकलं आहे. "इन्कलाब जिंदाबाद" भगतसिंगांचे नाव माहीत आहे, पण स्वातंत्र्याच्या लढ्यात असे हजारो वीर होते ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण इतिहासाच्या पानांवर त्यांची नावे फारशी आली नाहीत. 15 ऑगस्ट हा दिवस फक्त सुट्टीचा नाही, तर शहीदांना आठवण्याचा आहे. आज अशाच 4 विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या वीरांच्या गोष्टी.

1. **सेनापती बापट :- तर त्या विसरलेल्या शेतकऱ्यांचा कैवारी** पांडुरंग महादेव बापट अर्थात "सेनापती बापट" हे महाराष्ट्राचे भूषण होते. 1920 साली पुण्याजवळील मुळशी गावात इंग्रज सरकारने धरण बांधण्यासाठी शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी हिसकावून घेण्यास सुरवात केली, त्यावेळी बापटांनी शेतकऱ्यांना एकत्र करून सत्याग्रह केला व म्हणाले की, "शेतकऱ्यांची जमीन म्हणजे त्यांची माता आहे. मातेला विकता येत नाही!" या आंदोलनासाठी त्यांना 7 वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. गांधींच्या चळवळीएवढी प्रसिद्धी त्यांना मिळाली नाही, कारण त्यांची लढाई स्थानिक पातळीवर होती.
2. **मातंगिनी हाजरा :- वयाने आजी, जिद्दीने क्रांतिकारक** बंगालमधील मेदिनीपूर जिल्ह्यातील तामलुक गावच्या मातंगिनी हाजरा. वय 73 वर्षे, सर्वजण त्यांना "गांधी बुढी" म्हणत. 1942 च्या भारत छोडो आंदोलनात त्या आघाडीवर होत्या. 29 सप्टेंबर 1942 रोजी तामलुकमध्ये पोलीस स्टेशनवर तिरंगा फडकवण्यासाठी मोर्चा निघाला होता. पोलिसांनी अंदाधुंद गोळीबार सुरु केला. पहिली गोळी हाताला, दुसरी हाताला आणि तिसरी कपाळाला लागली. तरीही हातातील तिरंगा खाली न पडू देता 'वंदे मातरम' म्हणत त्या जमिनीवर कोसळल्या आणि शहीद झाल्या.

3. **वासुदेव बळवंत फडके :- भारतीय क्रांतीचे जनक** 1857 च्या उठावानंतर इंग्रजांविरुद्ध पहिला सशस्त्र बंड करणारे क्रांतिकारक म्हणजे वासुदेव बळवंत फडके. महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील शिरढोणमध्ये त्यांनी इंग्रजांच्या अन्यायी करांविरोधात आवाज उठवला. रामोशी, भिल्ल आणि कोळी समाजातील तरुणांना एकत्र करून त्यांनी गनिमी काव्याने इंग्रजांचे खजिने लुटले आणि गरिबांमध्ये वाटले.

4. **उधमसिंग :- 21 वर्षांनी घेतलेला बदला** - 13 एप्रिल 1919, जलियांवाला बाग. जनरल डायरच्या आदेशाने निष्पाप लोकांवर गोळ्या झाडल्या गेल्या. त्या गर्दीत उधमसिंग नावाचा एक तरुण होता. त्या हत्याकांडाने त्याचे मन सुन्न झाले. त्याने शपथ घेतली, "या रक्ताचा बदला घेईन".

21 वर्षे वाट पाहिली. 1940 मध्ये तो लंडनमध्ये गेला आणि एका सभेत जनरल डायरला गोळ्या घातल्या. त्याला अटक झाली आणि फाशीची शिक्षा झाली. फाशीच्या दिवशीही तो हसत होता. त्याचे शेवटचे शब्द होते, "मला माझ्या देशासाठी अभिमान आहे".

**आताच्या तरुणांची जबाबदारी :-** या 4 वीरांनी आपल्याला एकच गोष्ट शिकवली — स्वातंत्र्य फुकट मिळत नाही. कोणी शेतकऱ्यांसाठी लढले, कोणी वयाची पर्वा केली नाही, कोणी शस्त्र उचलले, तर कोणी 21 वर्षे बदल्याची वाट पाहिली. त्यांनी बंदुकीने आणि रक्ताने लढाई लढली. 2026 मध्ये आमची लढाई वेगळी आहे. आमची लढाई अशिक्षणाविरुद्ध, भ्रष्टाचाराविरुद्ध, प्रदूषणाविरुद्ध आणि फेक न्यूजविरुद्ध आहे. त्यांनी देश स्वतंत्र केला. आता ती स्वतंत्रता टिकवणे आणि "विकसित भारत 2047" घडवणे ही आमची जबाबदारी.

**उपसंहार :-** इतिहासात काही नावे सोनेरी अक्षरांनी लिहिली जातात आणि काही नावे मातीत मिसळतात. या स्वातंत्र्यदिनी चला, आपण या विसरलेल्या वीरांना सलाम करूया आणि त्यांच्या स्वप्नांचा भारत घडवण्याची शपथ घेऊया. कारण खरे स्वातंत्र्य तेव्हाच साजरे होईल जेव्हा शेवटच्या माणसापर्यंत त्याचा लाभ पोहोचेल.

जय हिंद !

**कु.शुभांगी जाधव**
**द्वितीय वर्ष वाणिज्य**

## मराठी अभ्यास मंडळ

IQAC विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी साहित्य व संशोधनाच्या नविन दिशा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.दि.१३/१२/२०२६ रोजी स्वामी विवेकानंद सभागृहात करण्यात आले यावेळी महाविद्याल्याचे प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे ,तर वक्ते म्हणून पुणे येथीस सक्षम समीक्षाचे मुख्य संपादक तथा मराठी विषयाचे साहित्यीक प्रा.डॉ.शैलेश त्रिभूवन ,नॅंक समन्वयक डॉ.नागेश गायकवाड तथा मराठी विभागाचे प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई उपस्थित होते.मराठी साहित्यातून जे समाज सुधारक पुढे आले त्यांनी आपल्या लेखनीतून व जगण्यातून समाजाला नविन दिशा देण्याचे काम केले.

रोजच्या व्यवहारात संशोधनातून नविन पैलू जन्माला येतात .संशोधनाचा विषय म्हणजे माणूस होणे होय. असे प्रतिपादन व्याख्यानातून व्यक्त केले.सुरवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.डॉ.सुभाष गव्हाणे यांनी डॉ.शैलेश त्रिभूवन यांचे शाल व पुस्तक देवून सत्कार केला.प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई यांनी प्रास्ताविक परिचय करून दिला. सुत्रसंचालन डॉ.नागेश गायकवाड यांनी केले.या प्रसंगी विचारमंचावर प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे ,IQAC समन्वयक डॉ.नागेश गायकवाड,प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई उपस्थित होते. –

**डॉ.प्रफुल्ल गवई**
मराठी विभाग प्रमुख

## माजी विद्यार्थी मेळावा

दिनांक 24/03/ 2026 रोजी महाविद्यालयात शैक्षणिक सत्र 2024-25 या वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला. सकाळी 9-10 दरम्यान 21 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. या मेळाव्याच्या उद्घाटनासाठी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे ,श्री सुनीलजी लाहोटी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे उपस्थित होते. सुरुवातीला विद्यापीठाचे दैवत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला हारअर्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सुभाष राऊत यांनी करीत माजी विद्यार्थ्यांना बोलवण्यात महाविद्यालयाची भूमिका या संबंधी माहिती दिली व पाहुण्यांचा परिचय करून दिला.

त्यानंतर उद्घाटनवर भाषणात संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष रामकृष्णादादा शेटे यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद पर मार्गदर्शन केलं आणि "आपण एसपीएमचे ब्रँड आहात ज्या ठिकाणी जाल त्या ठिकाणी आपलं भवितव्य हे उज्वलच असेल असा आम्हाला विश्वास आहे. त्या ठिकाणी आपण आपल्या कार्याचा निश्चितच ठसा उमटवाल याची आम्हाला खात्री आहे." असे प्रतिपादन केले महाविद्यालयाचे NAAC समन्वयक डॉ. नागेश गायकवाड यांनी माजी विद्यार्थ्यांची NAAC विषयक भूमिका समजाऊन सांगून सर्वांच्या सहकार्याची भूमिका मांडली. दुसऱ्या सत्रात मा.प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पूर्वीची व आजची शैक्षणीक स्थिती याविषयी आढावा घेतला. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि आपण या महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमान असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन माजी विद्यार्थी समिती समन्वयक डॉ. विजय वाकोडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी समितीचे सदस्य डॉ. माळशिखरे, डॉ.राऊत, प्रा. उल्हास ब्रह्मे, प्रा. मनीष पालवे व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

**प्रा. डॉ. विजय सावित्री कुंडलिक वाकोडे**

**समन्वयक**

## विद्यार्थी विकास मंडळ वार्षिक अहवाल

शैक्षणिक सत्र 2025-26 या वर्षात पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते-

1) '**वंदे मातरम्' कार्यक्रमात एस. पी. एम. महाविद्यालयाचा सहभाग :-**

दि.7 नोव्हेंबर 2025 रोजी शासनाच्या आदेशाने साजरा करण्यात येत असलेल्या ' वंदे मातरम्' च्या 150 वर्षपूर्ती निमित्त देशभर वंदे मातरम् चे जाहीर गान साजरे झाले. त्यात अनेक शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

एस. पी. एम. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने देखील सहभाग घेण्यात आला. मा.प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास मंडळ समन्वयक प्रा. डॉ.सुभाष राऊत यांनी आय टी आय चिखलाच्या वतीने आयोजित वंदे मातरम् कार्यक्रमात सर्व विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग होता. तसेच महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्यपूर्व काळात वंदे मातरम् या गीताने प्रेरित होऊन अनेकांनी स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिल्याचे अनेक प्रसंग नाटिकेच्या माध्यमातून सादर करण्यात आले. नाटिकेच्या सादरीकरणाने सर्व प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण संचारले होते.

2) **मतदार जनजागृती अभियान संपन्न :-**

दि. 14 नोव्हेंबर 2025 रोजी विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांनी रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती अभियान राबविले. सध्या सर्वत्र निवडणुकांची धामधूम सुरू आहे आणि त्यामध्ये भावी लोकप्रतिनिधी असोत की जनता यांच्या तोंडून आपसूक लोकशाही, मताधिकार, विकास अशा अनेक विषयावर चर्चा ऐकायला मिळते. परंतु लोकशाहीचा आत्मा असलेला मतदार राजा जागृत होऊन त्यांनी आपली सदसद विवेक बुद्धी वापरून योग्य प्रतिनिधीला मतदान करावे, कुठल्याही आमिषाला बळी न पडता आपला मताधिकार अतिशय अमूल्य आहे याची त्याला जाण व्हावी म्हणून एस.पी.एम. स्व.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने चिखली शहरात मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले.त्याचा शुभारंभ करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.रामकृष्ण दादा शेटे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ सुभाष गव्हाणे यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक प्रा.डॉ.सुभाष राऊत आणि महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक सहभागी होते. विद्यार्थांनी मतदार जागृती संदर्भात घोषणा फलके बनवून आणि तोंडी घोषणांचा जयघोष करून जागृती केली. महाविद्यालयात मतदार जनजागृती संदर्भात नियमित असे उपक्रम राबविण्यात येतात. त्यात कधी वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर बनविणे तर कधी रांगोळी आणि रॅली काढून हे उपक्रम राबविण्यात आले.

3) **मानसिक स्वास्थ कार्यशाळा संपन्न :-**

बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय आणि एस पी एम महाविद्यालय चिखली येथे एम्पावर प्रोजेक्ट अंतर्गत एक दिवसीय मानसिक स्वास्थ्य कार्यशाळा संपन्न झाली.
या कार्यशाळासाठी मार्गदर्शक म्हणून युवराज बोर्डे उपस्थित होते. सुरुवातीला विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. सुभाष राऊत यांनी प्रस्ताविकात कार्यशाळेचे उद्दिष्ट समजावून सांगितले. त्यात तरुण मुला-मुलींची शारीरिक आणि मानसिक वाढ होत असताना अनेक शारीरिक बदल घडत असतात त्यामुळे त्यांच्यात चिडचिड, राग आणि त्यातून आपल्याला कोणी समजून घेत नाही म्हणत नैराश्य येते आणि त्यात भर पडते ती मोबाईलवर वीचलीत करणाऱ्या रिल्सची. याच नैराश्यतून बाहेर पडण्यासाठी योग्य आणि विश्वासू मार्गदर्शकाची आवश्यकता असते, म्हणून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

प्रमुख मार्गदर्शक युवराज बोर्डे यांनी विद्यार्थ्यांना पावर पॉइंट प्रेझेंट द्वारे घरी आणि घराबाहेर घडणाऱ्या घडामोडींचा विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होतो. कधी कधी ते खोल निराशेत जाऊन चुकीचं पाऊल उचलतात तेव्हा त्यांना आपली समस्या कोणाशी तरी शेअर करता यावी यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात समूपदेशकांची मदत घेतल्या जाऊ शकते. तेथे 14 41 6 ह्या नंबर वर विनामूल्य समुपदेशन करण्यात येते. याचा समाजातील गरजूंनी आपली ओळख न सांगता लाभ घेता येतो असे प्रतिपादन केले.

तर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना निराशा येऊच नये यासाठी चांगल्या मित्रांची आणि गुरूंची संगत ठेवा म्हणजे योग्य वळणावर सुरक्षितता मिळेल असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय वाकोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. शैलेंद्र जैन यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**4) विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने संविधान दिन साजरा :-**

दि.26 नोव्हेंबर 2025 रोजी महाविद्यालयामध्ये संविधान दिन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख वक्ते डॉ. सुभाष राऊत यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी करून दिला. त्यानंतर संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून घेतले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. राऊत यांनी संविधानाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, संविधान आपल्या देशाचा आत्मा आहे. संविधान हे एक असे मार्गदर्शक तत्व आहे जे सांगते की, आपल्या देशाला कसे चालवायचे. ते प्रत्येक नागरिकाला समान अधिकार देते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना न्याय, स्वातंत्र्य ,समता आणि बंधुता मिळवून देण्याची हमी देते. आपल्या संविधानामुळेच आज भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि गणराज्य देश म्हणून जगात उभा आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्वांनी संविधानातील मूल्याचे पालन करून धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही मूल्यांचा सर्वांनी आदर करून चांगल्या व प्रगतशील भारताच्या निर्मितीसाठी आपले योगदान दिले पाहिजे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. किरण देशमाने व कु. अर्पिता हिवाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप महाजन यांनी केले.

**5) पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जागृती अभियान :-**

भारतीय लोकशाहीत सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मतदार. या मतदाराला 'मतदार राजा 'संबोधले जाते. परंतु हा मतदार राजा पाहिजे तेव्हढ्या प्रमाणात आपल्या संविधानिक हक्क आणि कर्तव्या विषयी जागा नसल्याचे जाणवते. तो कधी कधी पैशाच्या अमिषाल बळी पडताना दिसतो. म्हणून संविधानाने त्याला राजा बनण्याची संधी दिली असताना तो गुलामीचा रस्ता का निवडतो; तर लोकशाही, संविधान आणि मताच्या या अमूल्य अधिकाराविषयी त्याचे अज्ञान. म्हणूनच एस पी एम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष गव्हाणे यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ.सुभाष राऊत आणि प्रा. डॉ.विजय वाकोडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पथनाट्य बसवून चिखली शहरात रस्त्यावर हे प्रयोग सादर करण्यात आले. या पथनाट्यात मुलींचा सहभाग मोठ्या प्रमाणात असून त्या नागरिकांना आपल्या कलेच्या माध्यमातून मताचा अधिकार हा किती अमूल्य आहे त्याचा वापर लोकशाही मजबूत करण्यासाठी करण्यात यावा असे आवाहन करीत होत्या. कुठल्याही आमिषाला किंवा दबावाला बळी न पडता आपली सदसद विवेक बुद्धी वापरून मतदान करा अन्यथा पुढील पाच वर्षे पश्चातापाची वेळ येईल असे आवाहन करीत होत.

पैशावर मतदान विकणारे आणि स्वाभिमानाने मतदान करणारे यात काय फरक असतो यासाठी हे सादरीकरणातून लोकांचे डोळे उघडले पाहिजेत तरच ते आपला मताधिकार स्वाभिमानाने बजावतील अशी अपेक्षा आहे. त्याच बरोबर समन्वयक प्रा. डॉi. सुभाष राऊत, उपस्थित सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि नागरिक मत न विकण्याची शपथ घेतात . त्यात मी,माझा मताधिकार 100% बजावणार आणि तेही कुठल्याही आमिषाला बळी न पडता स्वाभिमानाने मतदान करणार अशी शपथ दिली जात होती.

हे पथनाट्य वेगवेगळ्या भागात सादर करण्यात आले. त्यासाठी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित असत.

**6) महाविद्यालयात वीर बाल दिवस संपन्न :-**

एस पी एम स्व.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली येथे 26 डिसेंबर 2025 रोजी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक प्रा.डॉ.सुभाष राऊत हे होते. तर या कार्यक्रमाला मंचावर उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाळकृष्ण इंगळे आणि आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. नागेश गायकवाड हे उपस्थित होते. सुरुवातीला महाविद्यालयाच्या काही विद्यार्थ्यांनी वीर बाल दिवसाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. सुभाष राऊत यांनी शीख धर्माचा सविस्तर आढावा घेऊन पंधराव्या शतकात गुरुनानक देव यांनी स्थापन केलेल्या शीख धर्माविषयी आणि त्यातील दहावे धर्मगुरू गोविंद सिंग यांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच 1708 पर्यंत चालू ठेवलेली परंपरा पुढे त्यांनीच लिहिलेल्या गुरुग्रंथसाहिबा हाच ग्रंथ शिखांचा ग्रंथ असेल असा संदेश दिला. त्याच प्रमाने राष्ट्रवादी गुरु गोविंद सिंग यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांना जेव्हा मुघलाकडून कैद केले आणि इस्लाम धर्म स्वीकारण्याविषयी दबाव ठेवण्यात आला तेव्हा त्यांनी वीर शौर्य दाखवत शीख तत्वांशी तडजोड न करता वीर मरण पत्करले. त्या प्रित्यर्थ हा वीर बाल दिवस साजरा करण्यात येत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांनी गुरुगोविंद सिंग यांचे वीर पुत्र साहीब जादा जोरावर सिंग वय वर्षे नऊ आणि साहीब जादा फत्तेसिंग वय वर्षे सहा यांनी अतिशय वीरतापूर्वक शीख धर्माप्रती निष्ठा आणि साहस दाखवत स्वतःला भिंतीत

गाडून घेण्याची शिक्षा मान्य केली पण दुश्मनासमोर हार पत्करली नाही. या छोट्या मुलांची वीरता आणि धाडस जगाला माहिती व्हावं म्हणून हा विरता दिवस साजरा करण्यात येत असले सांगितले. वीर बाल दिवस या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी केले.

7) **'युवारंग - 26' स्नेहसंमेलन :-**

एस. पी. एम. स्व.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली येथे 'युवारंग - 2026' उत्साहात सुरू झाले . दि.22 व 23 मार्च रोजी क्रीडा स्पर्धा पार पडल्या आणि दि. 24 मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन पार पडले. या कार्यक्रमासाठी उद्घाटक आणि अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा.रामकृष्ण दादा शेटे तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.सुनीलजी लाहोटी लाभले होत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य सुभाष गव्हाणे आणि पाहुण्यांनी दिप प्रज्वलन करून रीतसर सुरुवात केली.

प्रास्ताविकात विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ.सुभाष राऊत यांनी अहवाल वाचन करून स्नेहसंमेलनाचा खरा उद्देश आणि त्यातून विद्यार्थांच्या सुप्त गुणांना मिळणारी संधी ज्यातून भविष्यातील सुजान नागरिक घडावेत आणि SPM चा ब्रँड म्हणून नावलौकिक मिळवावा ही अपेक्षा व्यक्त केली.

उद्घाटन प्रसंगी मा.रामकृष्ण दादा शेटे यांनी विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनासाठी शुभेच्छा दिल्या.

याच कार्यक्रमात पुण्याच्या ग्लोबल फाउंडेशननी डॉ प्रदीप बारड आणि डॉ विजय वाकोडे यांना बेस्ट टीचर अवॉर्डने सन्मानित केल्या बद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या स्नेहसंमेलनात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात वैयक्तिक आणि सामूहिक गीत स्पर्धा, स्किट,एक मिनिट स्पर्धा, फॅन्सी ड्रेस, मिस मॅच, फिश पॉन्ड ,विविध गुणदर्शन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ विजय वाकोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.मनीष पालवे यांनी केले.

दि. 25 मार्च 2026 रोजी काही उर्वरित स्पर्धा ज्यात विविध कला गुणदर्शन आणि वेशभूषा ह्या स्पर्धा घेण्यात आल्या त्यात विद्यार्थ्यांनी अतिशय चांगला सहभाग नोंदवला.

त्यानंतर समारोपीय कार्यक्रमात पारितोषिक वितरण करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे आणि विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमात मिळवलेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

**प्रा. डॉ. सुभाष राऊत**
समन्वयक, विद्यार्थी विकास मंडळ,

## शारीरिक शिक्षण विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष 2025-2026 मध्ये क्रासकंट्रि मध्ये 05 अॅथलेटिक्स मध्ये 02, फेंसिंग मध्ये 02, कबडडी मध्ये 10 अशा विविध आंतर महाविदयालयीन क्रीडा स्पर्धेत एकुण 19 विदयार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

**आंतर महाविदयालयीन अॅथलेटिक्स स्पर्धेत कु.पुनम संजय देशमुख हिने 800 मी.धावणे या प्रकारात कास्य पदक प्राप्त केले.**

- दिनांक 21 जुन 2025 रोजी महाविदयालयात आंतरराष्ट्रिय योग दिन साजरा करण्यात आला.
- दिनांक 29 ऑगस्ट 2025 रोजी महाविदयालयात राष्ट्रिय क्रिडा दिन साजरा करण्यात आला. या दिवशी महाविदयालयात आंतरवर्गीय क्रासकंट्रि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी मा जिजाउ आणि स्वामी विवेकानंद जयंती निमित्त् संस्कार ते संकल्प् या युवा संस्कार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.
- दिनांक 15 जानेवारी 2026 रोजी महाविदयालयात राज्य् क्रिडा दिन साजरा करण्यात आला.
- दिनांक 22 व 23 मार्च 2026 या कालावधीत स्नेहसंमेलना अंतर्गत महाविदयालयात आंतरवर्गीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**प्रा.उल्हास वि. ब्रम्हे**
**शारीरिक शिक्षण संचालक**

## इतिहास अभ्यास मंडळ अहवाल: - २०२५-२६

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची आवड निर्माण व्हावी व खरा इतिहास समाजापुढे आणण्याचे उद्देशाने दरवर्षी इतिहास अभ्यास मंडळाचे गठन करण्यात येते. दिनांक १६/०८/२०२५ रोजी इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. इतिहास अभ्यास मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. सुरेश संतराम माळशिखरे यांनी इतिहास विषय असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या समक्ष सत्र २०२५-२६ ची इतिहास अभ्यास मंडळाची कार्यकारिणी घोषित केली.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | पद |
|---|---|---|---|
| १ | कु. पुनम अशोक देशमाने | अंत्य वर्ष कला | अध्यक्ष |
| २ | कु. किरण दशरथ देशमाने | द्वितीय वर्ष कला | उपाध्यक्ष |
| ३ | कु. जागृती प्रकाश गवई | अंत्य वर्ष कला | सचिव |
| ४ | कु. अर्पिता अनिल हिवाळे | द्वितीय वर्ष कला | सहसचिव |
| ५ | श्रीकांत सारंगधर जोशी | द्वितीय वर्ष कला | कोषाध्यक्ष |
| ६ | ओम परमेश्वर तारु | द्वितीय वर्ष कला | सदस्य |
| ७ | कु. प्रिती राजेंद्र इंगळे | प्रथम वर्ष कला | सदस्य |
| ८ | सुमेध मिलींद वानखेडे | प्रथम वर्ष कला | सदस्य |
| ९ | विशाल संदिप पवार | प्रथम वर्ष कला | सदस्य |
| १० | कु. वैष्णवी गोरखनाथ सरोदे | द्वितीय वर्ष कला | सदस्य |
| ११ | कु. निकिता संदिप सोळंकी | द्वितीय वर्ष कला | सदस्य |

वरील पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

**माहे ऑगस्ट २०२५**

- **दि. १६/०८/२०२५:** इतिहास अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. यावेळी इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. पुनम अशोक देशमाने (अंत्य वर्ष कला) हिची निवड करण्यात आली.
- **दि. २४/०८/२०२५:** प्रथम वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 'आश्रम व्यवस्था' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**माहे सप्टेंबर २०२५**

- **दि. १५/०९/२०२५:** द्वितीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 'सम्राट अकबर यांचे धार्मिक धोरण' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- **दि. २५/०९/२०२५:** अंत्य वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 'नेपोलियन बोनापार्ट यांचे कार्य' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
- **दि. २७/०९/२०२५:** इतिहास अभ्यास मंडळ अंतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय, चिखली येथील डॉ. मनोज सोनुने यांनी 'महाराष्ट्रातील किल्ले' याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ४० विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ. सुरेश माळशिखरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. किरण देशमाने तर आभार प्रदर्शनकु. प्रिती इंगळे हिने केले.

**माहे डिसेंबर २०२५**

- **दि. १६/१२/२०२५:** अंत्य वर्ष कला वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 'राजकीय परिषदा' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**माहे जानेवारी २०२६**

- **दि. १०/०१/२०२६:** द्वितीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 'सविनय कायदेभंग चळवळ' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**डॉ. सुरेश माळशिखरे**
इतिहास विभाग प्रमुख

## जयंती व पुण्यतिथी समिती शैक्षणिक

महाविद्यालयीन जीवन हे केवळ अध्ययन-अध्यापनापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, संस्कार, महापुरुषांच्या विचारांचा आदर, वाचनाची आवड आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारे विविध उपक्रम राबविणे हेही शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्देशाने जयंती व पुण्यतिथी समितीच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२५—२६ मध्ये महाविद्यालयात विविध जयंती, पुण्यतिथी तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथींचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमांचे पूजन, पुष्पहार अर्पण, अभिवादन व विचारप्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आले. महात्मा गांधी, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, संत गाडगेबाबा, संत रविदास महाराज, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी महापुरुषांच्या कार्याची व विचारांची विद्यार्थ्यांना माहिती करून देण्यात आली. त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडून "महापुरुषांचे विचार आणि आजची युवा पिढी" या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

स्वच्छता अभियान हा समितीच्या उपक्रमांचा महत्त्वाचा भाग राहिला. महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. वर्गखोल्या, परिसर, ग्रंथालय परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून "स्वच्छ महाविद्यालय, सुंदर महाविद्यालय" हा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा मर्यादित वापर आणि पर्यावरण संवर्धन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व पर्यावरणाबाबत जबाबदारीची भावना निर्माण झाली.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने पुस्तक प्रदर्शनी व ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, आत्मचरित्रे, साहित्यिक पुस्तके, स्पर्धा परीक्षांची पुस्तके तसेच महापुरुषांच्या जीवनकार्यावरील ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या प्रदर्शनाला भेट देऊन विविध पुस्तके पाहिली व त्यातील उपयुक्त साहित्याची माहिती घेतली.

वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत त्यांच्या वाचनप्रेमातून आणि ज्ञानलालसेतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी वाचन, पुस्तक परीक्षण, वक्तृत्व, निबंधलेखन व प्रश्नमंजुषा यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपली साहित्यिक व बौद्धिक क्षमता प्रदर्शित केली.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, पोस्टर निर्मिती, घोषवाक्य लेखन, व्याख्यानमाला, सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य, सर्जनशीलता, संघभावना आणि आत्मविश्वास विकसित होण्यास मदत झाली.

याशिवाय राष्ट्रीय एकात्मता, संविधान मूल्ये, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, सामाजिक स्वच्छता आणि नागरिकांची कर्तव्ये याबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. संविधान दिन, राष्ट्रीय एकता दिन आणि विविध राष्ट्रीय व सामाजिक दिनांचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महापुरुषांच्या विचारांचा केवळ गौरव न करता ते विचार आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची गरज विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आली.

या संपूर्ण शैक्षणिक सत्रात समितीच्या उपक्रमांचे नियोजन, आयोजन, सूत्रसंचालन, वक्ते व पाहुण्यांचे स्वागत, कार्यक्रमाची रूपरेषा तयार करणे, स्वच्छता व प्रदर्शनाची व्यवस्था तसेच विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी जबाबदारीने सहभाग घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, शिस्त, सहकार्याची भावना आणि नेतृत्वगुण विकसित झाले.

अशा प्रकारे जयंती व पुण्यतिथी समितीने शैक्षणिक सत्र २०२५–२६ मध्ये महापुरुषांच्या विचारांचे स्मरण, स्वच्छता, वाचनसंस्कृती, सामाजिक प्रबोधन आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग यांचा सुंदर समन्वय साधला. समितीच्या सर्व उपक्रमांना महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली समितीने वर्षभर विविध उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून महापुरुषांना आदरांजली अर्पण केली. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन जबाबदार, सुजाण, संवेदनशील आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याच्या महाविद्यालयाच्या प्रयत्नांना या उपक्रमांमुळे निश्चितच बळ मिळाले.

**प्रा. मनीष उमाकांत पालवे**
समन्वयक, जयंती व पुण्यतिथी समिती

## **सांस्कृतिक कार्यक्रमांचा अहवाल** (2025-26)

2025-26 या शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून खालील प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1. **संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युथ फेस्टिवल मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग** (10 **ऑक्टोबर** 2025)

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत केशरबाई लाहोटी महाविद्यालय पंचवटी अमरावती या ठिकाणी ऑक्टोबर महिन्यामध्ये युथ फेस्टिवल 2025 चे आयोजन करण्यात आले होते. या युथ फेस्टिवल मध्ये महाविद्यालयातील आश्विनी गौतम हिवाळे व संध्या गौतम इंगळे या विद्यार्थिनींनी मेहंदी व रांगोळी या कलाप्रकारात सहभाग घेतला. अमरावती येथे जाण्यासाठी शाहीन नंदावाले मॅडम तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. विजय वाकोडे यांचा पुढाकार होता.

2. **जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा** (12 **नोव्हेंबर** 2025)

2025 हे वर्ष सर्व जगभरात **आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष** म्हणून साजरे केले गेले. सहकार क्षेत्राचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच सहकारी तत्त्वांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक व्हावी या उद्देशाने वर्षभरात विविध प्रकारच्या स्पर्धा कार्यक्रमांचे आयोजन राज्य सहकारी बोर्ड बुलढाणा जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या माध्यमातून करण्यात आले. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे बुलढाणा जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित बुलढाणा आणि एसपीएम स्व.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या विवेकानंद हॉलमध्ये दिनांक 12 नोव्हेंबर 2025 रोजी करण्यात आले.

जिल्हाभरातून विविध विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. आपल्या महाविद्यालयाचे कु. लक्ष्मी शिंदे हिने या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. अनुराधा इंजीनियरिंग कॉलेजचा विद्यार्थी प्रणव चवरे या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला तर तृतीय क्रमांक नारायणराव देशमुख महाविद्यालय अमडापूर येथील प्रतीक्षा देशमाने या विद्यार्थिनीने मिळविला.

या स्पर्धेला जिल्हा सहकार विकास अधिकारी, बुलढाणा जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित बुलढाणा येथून अंकुश देशमुख सर उपस्थित होते. सर्वप्रथम त्यांनी स्पर्धेच्या अटी, वेळ याविषयी सर्व स्पर्धकांना माहिती दिली. बाह्य परीक्षक म्हणून नारायणराव देशमुख महाविद्यालय अमडापूर येथील प्राचार्य डॉ. अनंतराव पवार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाचे समन्वयक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजय वाकोडे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे सर यांनी सर्व स्पर्धकांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेतून प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या आपल्याच महाविद्यालयातील कु. लक्ष्मी शिंदे या विद्यार्थिनीला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुणे या ठिकाणी पाठविण्यात आले होते.

**3. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये लक्ष्मी शिंदे हिचा सहभाग :-**
**(14 नोव्हेंबर 2025)**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शुक्रवार दिनांक 14 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी नऊ वाजता संघाच्या वसंतदादा पाटील सभागृह ५, बीजे रोड, साधू वासवानी चौकाजवळ, गोदरेज शोरूम च्या मागे, पुणे येथे करण्यात आले होते. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या आपल्याच महाविद्यालयातील लक्ष्मी शिंदे या विद्यार्थिनीला पाठविण्यात आले होते. तिने या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला.

**4. जिजामाता महाविद्यालयातील जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग व प्रोत्साहनपर बक्षीस (23 डिसेंबर 2025)**

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 127 व्या जयंती वर्षानिमित्त जिजामाता महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये बुलढाणा जिल्ह्यातून अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील सार्थक पंडित बोरकर या विद्यार्थ्यांने या स्पर्धेत प्रोत्साहन पर बक्षीस मिळविले. या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पहिल्या सत्राचे रिसोर्स पर्सन म्हणून प्रा.डॉ. विजय वाकोडे हे होते.

**5. स्नेहसंमेलनामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग :-**
**(22 ते 24 मार्च 2026)**

शैक्षणिक सत्र 2025 26 चे महाविद्यालयातील स्नेहसंमेलन दिनांक 22 मार्च ते 24 मार्च यादरम्यान घेतले गेले. या स्नेहसंमेलनामध्ये सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून माझ्याकडे जबाबदारी होती. मी ती यशस्वीपणे पार पाडली. 22 व 23 मार्च रोजी विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्यास तर दिनांक 23 व 24 मार्च 2026 रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली यामध्ये दिनांक 24 मार्च 2026 रोजी पोस्टर मेकिंग, रांगोळी, चित्रकला सोबतच गीत गायन स्पर्धा आणि मी मुक्त मोरनी बाई ही अतिशय उत्कृष्ट अशी एक नाटिका सादर केली गेली. याच दिवशी दुपारच्या सत्रांमध्ये मिस मॅच स्पर्धा एक मिनिट स्पर्धा आणि फिश पॉन्ड स्पर्धा घेण्यात आली या विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

दुसऱ्या दिवशी 25 मार्च 2026 रोजी वेशभूषा स्पर्धा, विविध गुणदर्शन स्पर्धा आणि शेवटी बक्षीस वितरणाचे वाटप करण्यात आले या दुसऱ्या दिवशीच्या स्पर्धांमध्ये देखील विविध विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

**प्रा. डॉ. विजय सावित्री कुंडलिक वाकोडे**
**सांस्कृतिक प्रमुख**

ज्ञानाची ज्योत मनामध्ये पेटवा,
यशाचा मार्ग स्वतःच शोधा,
अडचणी आल्या तरी नका थांबू,
मेहनतीने स्वप्नांना सत्यात आणा.

पुस्तकांशी मैत्री केली की,
ज्ञानाची दारे खुलतात,
वाचनाच्या सुंदर वाटेवर,
यशाची पाऊले पडतात.

**कु. शितल शहाणे**

शिक्षण म्हणजे फक्त गुण नव्हे,
जीवन जगण्याची कला आहे,
विचारांना दिशा देणारे,
शिक्षणच खरी शक्ती आहे.

शिस्त अंगीकारा जीवनात,
कर्तव्याची जाण ठेवा,
चांगल्या सवयींच्या जोरावर,
सुंदर भविष्य घडवा.

**कु. लक्ष्मी नाके**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

**प्रास्ताविक-**

या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रम व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ते खालील प्रमाणे.

1. जागतिक युवा दिन -दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी जागतिक युवा दिनाचे औचित्य साधून चिखली ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टर भावनाताई कॅम्बल व गवळी साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
2. घर घर तिरंगा अभियान---दिनांक 13, 14 आणि 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने हर घर तिरंगा अभियान साजरे करण्यात आले महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांना त्यांच्या घरी लावण्यासाठी 200 तिरंग्याची खरेदी करून ते वितरित करण्यात आले. तसेच दत्तग्राम गोदरी येथेही राष्ट्रध्वज तिरंगा भेट देण्यात येऊन जनजागृती करण्यात आली.
3. दिनांक 19- 8-2025 रोजी जागतिक मानवता दिन साजरा करण्यात आला.
4. दिनांक 26 ऑगस्ट 2025 रोजी अमली पदार्थ विरोधी दिन यावर प्राध्यापक वाकोडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
5. दिनांक 17 सप्टेंबर 2025 रोजी रक्तदान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करून समाजाने जास्तीत जास्त रक्तदान करावे याविषयी कॅप्टन शरद रावे यांनी मार्गदर्शन केले.
6. दिनांक 18 सप्टेंबर 2025 रोजी स्वच्छ भारत अभियान या अंतर्गत महाविद्यालय व महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या परिसराची राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली.
7. दिनांक 19 सप्टेंबर 2025 रोजी तहसील कार्यालयामार्फत आयोजित सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद घेऊन त्यांना सहकार्य केले.
8. दिनांक 22 सप्टेंबर 2025 रोजी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान व झिरो वेस्ट मॅनेजमेंट यावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
9. दिनांक 23 सप्टेंबर 2025 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील गरजू व्यक्तींकरिता ग्रामीण रुग्णालय चिखली व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये 315 लोकांनी याचा लाभ घेतला.
10. दिनांक 24 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला.
11. दिनांक 25 सप्टेंबर 2025 रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे एकात्म मानव दर्शन यावर प्राध्यापक डॉ. ठोसर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
12. दिनांक 26 सप्टेंबर 2025 रोजी एक पेड मा के नाम या अनुषंगाने समाजामध्ये झाडाचे महत्व वाढावे या दृष्टीने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.
13. दिनांक 27 सप्टेंबर 2025 रोजी शिवाजी महाराजांचे शिवकालीन गडकिल्ले या विषयावर डॉ. मनोज सोनवणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.
14. दिनांक 7 नोव्हेंबर 2025 रोजी औषध सुरक्षा सप्ताह विषयक मार्गदर्शनात डॉ. गौरव हरलालका यांनी औषध घेताना कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले.
15. दिनांक 26 नोव्हेंबर 2025 रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून संविधानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने प्राध्यापक डॉ. राऊत यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

17. दिनांक एक डिसेंबर 2025 रोजी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालय चिखली येथील डॉ. भावनाताई कॅम्बल व डॉक्टर खरात मॅडम तसेच डॉ. गवळी साहेब यांनी विद्यार्थ्यांना एड्स बाबत योग्य ते मार्गदर्शन केले.

18. दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी गाडगेबाबा यांच्या दशलक्षी सूत्रावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

19. दिनांक 3 जानेवारी 2026 रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त स्त्री सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

20. दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी युवा दिनाचे औचित्य साधून डॉक्टर भावनाताई कॅम्बल यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

**दिनांक** 15 **फेब्रुवारी ते** 22 **फेब्रुवारी** 2026 **दरम्यान ग्राम गोदरी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या श्रमसंस्कार शिबिरामध्ये पाणलोट क्षेत्र, स्वच्छता अभियान, लेक वाचवा इत्यादी बाबींवर काम करण्यात आले.**

( **डॉ. बाळकृष्ण स.इंगळे** ) ( **डॉ.दिलीप पां.महाजन**)

ऑनलाइन शिक्षण आले घरी,
ज्ञान झाले सहज उपलब्ध,
तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून,
विद्यार्थी होऊ देत सक्षम.

शिक्षण घेऊन सक्षम व्हा,
स्वावलंबनाचा ध्यास धरा,
स्वतः घडताना समाजालाही,
प्रगतीच्या वाटेवर न्या.

**बुध्दभूषण पैठणे**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात,
नव्या संधी ओळखा,
तंत्रज्ञानासोबत मानवी मूल्ये,
मनामध्ये सदैव जपा.

कष्टाला पर्याय नाही,
जिद्दीला सीमा नाही,
ध्येयासाठी चालत राहिलात,
यशाला दूरता नाही

**ऋषीकेश देवकर**

## ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग

### १. प्रास्ताविक:

उच्च शिक्षणाची अभिवृद्धी व त्याचे बळकटीकरण व अति अत्युच्च गुणवत्ता विकसित करायचे असेल तर उच्च शिक्षणामध्ये ग्रंथालय हे हृदय स्थानी असते असे म्हणून चालणार नाही. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा ज्ञानाच्या कक्षा अधिक विकसित करण्यासाठी वाचनाचा व्यासंग वाढणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना विद्याभिषेक स्वायत्तता मिळाली असल्यामुळे विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळाले आहे. वेगवेगळे विषय आणि विद्यार्थ्यांची निवड यासाठी त्यांच्या विषयाची पुस्तके ग्रंथालयात असणे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे ग्रंथ संग्रह विकसित करणे (Collection Development) अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. नवनवीन विषय आणि नवीन ग्रंथाची निर्मितीचा वेग कमी असल्यामुळे ग्रंथपालाचे कसब या काळात वापरणे जिकरीचे झाले आहे. त्यामुळे ई-ग्रंथ आणि इंटरनेटचा वापर गरजेचा झाला आहे. यासाठी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना दोन संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहे.ग्रंथालयात इन्फॉर्मेशन लायब्ररी नेटवर्क चे सोल 2.0 च्या माध्यमातून 2010-11 पासून संगणकीकृत ग्रंथालय आहे..

### २. ग्रंथालय सांख्यिकी आणि सुविधा :-

- **एकूण ग्रंथसंख्या:** २७,४६६
- **नियतकालिके:** ०५
- **वर्तमानपत्रे:** ०५
- **डिजिटल सुविधा:** माहिती शोधासाठी २ संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
- **विद्यापीठ ग्रंथालय समन्वय:** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ ग्रंथालयाचा वापर करता यावा, यासाठी विशेष समन्वय साधण्यात येत आहे.

### ३. संशोधन आणि उल्लेखनीय यश:

- **पीएच.डी. प्राप्ती:** कु. स्वाती योगेश मते यांना २५ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रंथालय विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.
- **संशोधन विद्यार्थी:** सध्या ०५ विद्यार्थी संशोधन केंद्रात कार्यरत आहेत.
- **प्रकाशने व बौद्धिक संपदा:**
  - प्रकाशित ग्रंथ: ११
  - पेटंट: ०३
  - कॉपीराईट: ०३
- **विद्वान स्कोअर (VIDWAN Score):** 9.8/10
- **विशेष बहुमान:** आंतरराष्ट्रीय संशोधकाच्या यादीत स्थान प्राप्त.

### ४. पुरस्कार व सन्मान:

- **बेस्ट लायब्ररीयन अवॉर्ड - २०२६:** नॅशनल ग्लोबल फाउंडेशन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय (केडगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिषदेत विभागाला 'सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

### ५. आयोजित उपक्रम व कार्यक्रम (२०२५-२६):

विभागामार्फत वर्षभरात खालील महत्त्वपूर्ण कार्यक्रम राबविण्यात आले:

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | **दीक्षारंभ (Induction)** | २४ जुलै २०२५ | नवीन विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवा, ई-संसाधने आणि वाचक प्रशिक्षण (User Orientation) देणे. |
| २ | **राष्ट्रीय ग्रंथपाल दिन** | १२ ऑगस्ट २०२५ | डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त 'फाइव लॉज ऑफ लायब्ररी' व ग्रंथालय शास्त्राची माहिती देणे. |
| ३ | **अतिथी व्याख्यान (AI)** | २५ ऑगस्ट २०२५ | 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स व ग्रंथालय यांचा संशोधनात वापर' यावर डॉ. मंगला हिरवाडे व प्रा. योगेश मते यांचे मार्गदर्शन. |
| ४ | **वाचन प्रेरणा दिन** | १५ ऑक्टोबर २०२५ | डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे. |

**६. विस्तार उपक्रम व व्याख्याने**

ग्रंथपालांच्या माध्यमातून विविध व्यासपीठांवर खालील विषयांवर व्याख्याने देण्यात आली:

- **रोजगार संधी:** एन.एस.एस. शिबिर, गोदरी (१८ फेब्रु. २०२६).
- **मराठी भाषा गौरव:** मराठी अभ्यास मंडळ आयोजित व्याख्यान (२७ फेब्रु. २०२६).
- **यशवंतराव चव्हाण जयंती:** चव्हाण यांच्या धोरणांवर मार्गदर्शन (१२ मार्च २०२६).

**७. सामंजस्य करार (MoU):**

1. श्रीमती सिंधुताई जाधव विज्ञान व कला महाविद्यालय, मेहकर.
2. संत भगवान बाबा महाविद्यालय, सिंदखेडराजा.
3. सेंट विन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे.
4. सुनील रामसिंग चुनावाले आयुर्वेदिक महाविद्यालय, चिखली.

**८. इतर योगदान:**

- **संपादकीय मंडळ:** 'Journal of Emerging Technology and Innovative Research' (नवी दिल्ली) या नामांकित जर्नलच्या संपादकीय मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत.

**निष्कर्ष : -**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ग्रंथालय विभागाने केवळ ग्रंथ साठवणूक न करता, आधुनिक तंत्रज्ञान (AI) आणि संशोधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाची माहिती उपलब्ध करून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

\-

\- **प्रा. डॉ. प्रदीप हिम्मतराव बारड,**
**प्रमुख, ग्रंथालय व प्रोफेसर**

शिक्षणाची मशाल घेऊन,
अज्ञानाचा अंधार दूर करा,
स्वतः उजळून इतरांनाही,
ज्ञानाचा प्रकाश द्या.

**करण साळवे**

मनामध्ये सकारात्मकता ठेवा,
नकारात्मक विचार दूर करा,
प्रत्येक दिवस नवी संधी समजून,
यशासाठी प्रयत्न करा.

**कु. प्राजक्ता उद्रकर**

## अर्थशास्त्र विभाग (अर्थशास्त्र नियोजन मंडळ ) अहवाल

आधुनिक जागतिकीकरण, उदात्तीकरण व खाजगीकरणाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या गळेकापू स्पर्धेच्या युगात अर्थशास्त्र विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे अर्थशास्त्राचा विद्यार्थी सक्षम करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग नियोजन मंडळा अंतर्गत नियोजन मंडळाची स्थापना करून विविध विषयावरील व्याख्याने आयोजित करुन, विद्यार्थ्यांसाठी संशोधनपर विद्यार्थी कार्यशाळा आयोजित करुन, विविध चर्चासत्रे व अर्थ ज्ञान स्पर्धा परीक्षा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे महाविद्यालयात अर्थशास्त्र नियोजन मंडळाद्वारे करण्यात येते.

दि.11 जुलै जागतिक लोकसंख्या दिन' दि.11 जुलै 2025 रोजी महाविद्यालयात हा "जागतिक लोकसंख्या दिन "संपन्न झाला, याप्रसंगी एस.पी.एम. स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे अर्थशास्त्र नियोजन मंडळ प्रमुख प्रा. डॉ.दिलीप महाजन, अर्थशास्त्र विभाग प्रमुख हे या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मनीष पालवे उपस्थित राहून या विषयावर त्यांचे व्याख्यान या प्रसंगी संपन्न झाले.

**अर्थशास्त्र नियोजन मंडळाचे गठन संपन्न:**

दि.25.09.2025 रोजी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळाचे प्रमुख प्रा.डॉ. दिलीप महाजन यांच्या अध्यक्षतेखाली अर्थशास्त्र विभागांतर्गत नियोजन मंडळाची कार्यकारणी कला व वाणिज्य शाखेच्या सर्व विदयार्थ्यांना एकत्रित बोलावून त्यांची एकत्रित बैठक घेण्यात आली व त्यातून पुढील प्रमाणे कार्यकारिणी व पदाधिकारी घोषित करण्यात आली.

**अर्थशास्त्र** - नियोजन मंडळाची कार्यकारणी पुढील प्रमाणे पदाधिकारी -कार्यकारणी

घोषित करण्यात आली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | अभिजित देविदास वाघ | बी .कॉम.3 | - | अध्यक्ष. |
| 2) | कु.जागृती प्रकाश गवई | बी.ए.3 | - | उपाध्यक्ष. |
| 3) | कु. प्रेरणा सुधीर जामदार | बी.ए.2 | - | सचिव. |
| 4) | कु.लक्ष्मी प्रदीप नाके | बी.कॉम.2 | - | सहसचिव |
| 5) | कु.पल्लवी न्यानेश्वर बोर्डे | बी.ए.3 | - | कोशाध्यक्ष |
| 6) | कु.सलोनी राजेश जाधव | बी.कॉम.2 | - | सहकोषाध्यक्ष. |
| 7) | कु.शर्वरी गजानन कुलकर्णी | बी.कॉम.3 | - | सदस्य. |
| 8) | कार्तिक गजानन थोरात | बी.ए.2 | - | सदस्य, |
| 9) | कु.अश्विनी गौतम हिवाळे | बी. ए.1 | - | सदस्य. |
| 10) | कु.प्रतीक्षा अनिल साळवे | बी.ए.1 | - | सदस्य. |
| 11) | कु.काजल सुभाषचंद्र मिसाळकर | बी.कॉम.1 | - | सदस्य. |
| 12) | कु.स्नेहा राजेंद्र लहाने. | बी कॉम.1 | - | सदस्य, |
| 13) | कु. संध्या गौतम इंगळे | बी.ए.1 | - | सदस्य, |

अशा प्रकारे वरील पद्धतीने अर्थशास्त्र विभागांतर्गत नियोजन मंडळाचे गठन करून अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळ प्रमुख प्रा.डॉ.दिलीप पां. महाजन यांच्याद्वारे सदर जम्बो कार्यकारिणी तयार करून या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सतीश मोरे व प्रा.डॉ. विजय वाकोडे यांनी केले.सदर प्रसंगी प्रा.डॉ.सुरेश माळशिखरे,प्रा.शरद रावे मंचावर उपस्थित होते.

दि.22.09.2025 रोजी बी.ए.2 च्या विद्यार्थ्यांच्या अर्थशास्त्र मेजर 3 च्या विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दिनांक 23 .9 .25 मंगळवार रोजी बी.ए.1च्या अर्थशास्त्र विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 13 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दि. 24 सप्टेंबर 2025 रोजी बी.ए. 2 च्या अर्थशास्त्र मेजर 4 च्या विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

दि.26 सप्टेंबर 2025 रोजी बी.ए. 2-अर्थशास्त्र मायनर च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

दि. 29 सप्टेंबर 2025 रोजी बी.ए.3 च्या अर्थशास्त्र च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले .यात एकुण 02 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.06 ऑक्टोबर 2025 रोजी बी. ए.2 च्या विद्यार्थ्यांच्या अर्थशास्त्र मेजर 3 च्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकुण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.07 ऑक्टोबर 2025 रोजी बी.ए. 3 च्या विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले .यात एकूण 02 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.08 ऑक्टोबर 2025 रोजी बी.ए.2-च्या अर्थशास्त्र मेजर 4 च्या सेमिनारच्या आयोजन करण्यात आले.यात एकुण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.09 ऑक्टोबर 2025 रोजी बी. ए.1च्या अर्थशास्त्र सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 13 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि. 10 ऑक्टोबर 2025 रोजी बी.ए.2 च्या अर्थशास्त्र मायनर विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.02 फेब्रुवारी 2026 रोजी सोमवारला बी.ए.2 सेमिस्टर 4 च्या इलेक्टिव्ह मायनर या विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दि.09 फेब्रुवारी 2026 रोजी सोमवारला बी.ए. 2 च्या sem.4 च्या अर्थशास्त्र मेजर 6 च्या विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.10 फेब्रुवारी 2026 रोजी मंगळवार ला बी.ए.1 च्या सेमिस्टर 2 च्या अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 13 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.11 फेब्रुवारी 2026 रोजी बी.ए. 2 च्या सेमिस्टर 4 च्या मेजर 5च्या अर्थशास्त्राच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

दि.13 फेब्रुवारी 2026 शुक्रवार रोजी बी. ए. 2च्या सेमिस्टर 4 मायनर अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि. 13 फेब्रुवारी 2026 रोजी शुक्रवारला बी.ए. 3 च्या सेमिस्टर 6 च्या अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 02 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि. 09 मार्च 2026 रोजी सोमवारला बी ए दोन सेमिस्टर चार चार इलेक्टिव्ह मायनर या विषयाच्या अर्थशास्त्राच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला

दि.13 मार्च 2026 रोजी शुक्रवारला बी.ए .2 च्या सेमिस्टर 4 च्या मायनर अर्थशास्त्राच्या विषयाची सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि.16 मार्च 2026 रोजी सोमवारला बी. ए. 2 सिमिस्टर 4 च्या मायनर मेजर 6 च्या अर्थशास्त्राच्या विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले . यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

दि. 17 मार्च 2026 रोजी मंगळवार ला बी. ए. 2 च्या सेमिस्टर 2 च्या अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले .यात एकूण 13 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

दि.18 मार्च 2026 रोजी बुधवार ला बी.ए.2 सेमिस्टर चार च्या मेजर 5 च्या अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले. यात एकूण 05 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

दि. 20 मार्च 2026 रोजी शुक्रवारला बी.ए .3 च्या सेमिस्टर 6 च्या अर्थशास्त्र विषयाच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले.यात एकूण 02 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

**प्रा. डॉ. दिलीप पां. महाजन.**
**अर्थशास्त विभाग तथा नियोजन मंडळ प्रमुख**

## पर्यावरण शास्त्र व नेचर क्लब -वृक्ष लागवड आणि अभिनव उपक्रम

1. एकूण उपस्थित विद्यार्थी - 35 2. एकूण वृक्ष लागवड - 15

3. एकूण वृक्ष वाटप - 35

**अभिनव उपक्रम**-महाविद्यालयातील नेचर क्लब च्या वतीने दिनांक 05 जून 2025 रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आली यामध्ये विविध पद्धतीचे 15 वृक्षांची लागवड करण्यात येऊन 35 विद्यार्थ्यांना वृक्षांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे मा. प्राचार्य प्रा. डॉ. सुभाष गव्हाणे तसेच ग्रंथपाल प्रा. डॉ. प्रदीप बारड व प्रा. डॉ. सतीश मोरे ,नेचर क्लब समन्वयक हे उपस्थित होते.

महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सत्र 24-25 व 25 -26 दरम्यान आपल्याला उपलब्ध सौरऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करून वीज निर्मिती करावी याकरिता मा. प्राचार्यांच्या नेतृत्वामध्ये एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला, त्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण 16 जणांनी प्रत्येकी 3.3 किलोचे सोलर पॅनल बसविले एकूण 52.8 किलो वॅटचे सोलर पॅनल बसविल्या गेले.

यातून सरासरी रोजचे 15 युनिट प्रत्येकी असे 450 युनिट दररोज या सौरऊर्जेमार्फत तयार होतात. महिन्याकाठी 7200 युनिट तयार केले जातात. म्हणजेच वर्षाला 86,400 युनिट वीज तयार होते. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागांतर्गत कार्यरत असलेले इंग्रजी भाषा व साहित्य मंडळ दरवर्षी स्थापन करण्यात येते. चालू शैक्षणिक सत्रासाठी या मंडळाची औपचारिक स्थापना २५ सप्टेंबर २०२५ रोजी मा. उपप्राचार्य प्रा. डॉ. दिलीप महाजन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

## इंग्रजी भाषा व साहित्य मंडळाचे उद्घाटन

The English Language and Literature Forum, functioning under the college's Department of English, is constituted annually. For the current academic session, the Society was formally constituted on September 25, 2025, under the chairmanship of the Honorable Vice-Principal, Prof. Dr. Dilip Mahajan.

Prof. Dr. Kedar Thosar, Head of the Department of English, was present as a guide for this initiative. The committee comprises a total of 11 members, and various activities are organized through it throughout the year. Prof. Dr. Satish Morey serves as the head of this committee. The committee functions with the objective of fostering an interest in English language and literature among students by organizing a diverse range of activities.

On October 8, 2025, the inauguration and lecture of the English Language and Literature Forum were held under the chairmanship of the Honorable Principal, Dr. Subhash Gawhane. **Workshop on English for Advance Career was organised**

For this event, Prof. Dr. Imtiaz Jukalkar, Head of the Department of English at Shri Shivaji Senior College, Chikhli, was invited to deliver a lecture. By organizing a one-day workshop themed 'English for Advanced Careers,' the organizers provided the students with a golden opportunity.

Thirty-nine students participated in this workshop. During the session, Prof. Dr. Jukkalkar provided detailed guidance to the students regarding the English language—specifically its significance, and how it can be effectively utilized to foster their holistic development, particularly from the perspective of advancing their careers.

The program was presided over by the Honorable Principal of the college, Dr. Subhash Gawhane, while Prof. Dr. Imtiyaz Jukkalkar served as the Chief Guide. The proceedings—including the anchoring and the vote of thanks—were conducted by the committee coordinator, Prof. Dr. Satish Morey.

**Co-ordinator,**

**Prof. Dr. Satish Morey**

## राज्यशास्त्र अभ्यास मंडळ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजकीय घडामोडी सोबतच राजकीय संकल्पनांची जाणीव व्हावी व राज्यातील राजकीय प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढावा आणि त्यातूनच उद्याचे नेतृत्व तयार व्हावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले या अभ्यास मंडळामार्फत राबविण्यात आलेले उपक्रम पुढील प्रमाणे -

**1) अभ्यास मंडळ गठन (दि. 25 सप्टेंबर 2025)**

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा राज्यशास्त्र अभ्यास विषय घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दि. 25 सप्टेंबर 2025 रोजी एकत्रित बोलविण्यात आले होते. या सभेमध्ये सर्वप्रथम राज्यशास्त्र अभ्यास मंडळ लोकशाही मार्गाने गठन करण्याची प्रक्रिया प्रा.डॉ.नागेश गायकवाड यांनी सविस्तर समजून सांगितली सोबतच अभ्यास मंडळाची कर्तव्य व जबाबदारी सुद्धा स्पष्ट करून दिली. यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यास मंडळ गठनाच्या प्रक्रियेला लोकशाही पद्धतीने सुरुवात करून सर्वानुमते आपापल्या वर्गातून पदाधिकाऱ्यांची निवड केली. नंतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या मधूनच कु. किरण दशरथ देशमाने बी.ए. द्वितीय वर्ष यांची अध्यक्ष म्हणून निवड केली.

**राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी सत्र -2025 - 26**

| | | |
|---|---|---|
| 1) | कु. किरण दशरथ देशमाने | अध्यक्ष |
| 2) | कु. जागृती प्रकाश गवई | उपाध्यक्ष |
| 3) | कु. संध्या गौतम इंगळे | सचिव |
| 4) | कु. प्रतीक्षा अनिल साळवे | सदस्य |
| 5) | कु. अर्पिता अनिल हिवाळे | सदस्य |
| 6) | कु. अश्विनी गौतम हिवाळे | सदस्य |
| 7) | ओम विष्णु भुतेकर | सदस्य |
| 8) | श्रीकांत सारंगधर जोशी | सदस्य |
| 9) | कु. दुर्गा उकंडा बोंबले | सदस्य |

**2) आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन (दि.२९ सप्टेंबर २०२५)**

महाविद्यालयातील, राज्यशास्त्र विभाग द्वारा 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' साजरा करण्यात आला. प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी लोकशाहीचा विकास करून संपूर्ण जगामध्ये सुशासन निर्माण करण्याच्या उद्देशाने 2015 या वर्षापासून युनोने आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयांमध्ये हा दिन साजरा केला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रा.डॉ. नागेश गायकवाड यांनी प्रास्ताविक करून केली. तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. एल. एफ. शिराळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, विदर्भ महाविद्यालय बुलढाणा हे होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. सुभाषजी गव्हाणे हे होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचान कु. किरण देशमाने व कु. अर्पिता हिवाळे बी.ए. भाग दोन च्या विद्यार्थिनींनी केले. तर या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी मानले. याप्रसंगी मंचावर प्रा. डॉ. दिलीप महाजन हे उपस्थित होते.

**3) मतदार जनजागृती रॅली (दि.14 नोव्हेंबेर 2025)**

लोकशाहीचा कणा असलेले मतदान हे प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. देशाच्या भविष्याची दिशा ठरविण्यात तरुणाईची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. विशेषतः महाविद्यालयातील विद्यार्थी हे समाजातील जागरूक, सुशिक्षित आणि जबाबदार घटक असल्याने त्यांनी मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने आपल्या महाविद्यालयाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती होण्यासाठी, मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन महाविद्यालयातील एन.सी.सी. विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राज्यशास्त्र विभाग व ज्युनिअर कॉलेज च्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या रॅलीची सुरुवात शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष श्री रामकृष्ण दादा शेटे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाषजी गव्हाणे यांनी हिरवी झेंडी दाखवून व विद्यार्थ्यांना मतदार हक्काबाबत घोषवाक्यांची माहिती देऊन केली.

**४) पथनाट्याद्वारे 'मतदान जनजागृती' अभियान (दि. २९ नोव्हेंबेर २०२५)**

लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे मत बहुमोल असते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आणि नवमतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मतदान जनजागृती' या विषयावर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

**५) राष्ट्रीय मतदार दिन (दि.२५ जानेवारी २०२६)**

महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग व एन. सी. सी. विभागामार्फत राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाषजी गव्हाणे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नागेश गायकवाड हे होते. या प्रसंगी मंचावर एन.सी.सी. विभाग प्रमुख कॅप्टन शरद रावे उपस्थित होते.

निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस 25 जानेवारी 1950 हा आहे. त्याचेच औचित्य साधून 2011 पासून भारतामध्ये निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस हाच राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी भारतामध्ये नव मतदारांना मतदार नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांना मतदाराची कर्तव्य व लोकशाहीला मजबूत करण्यासाठी मतदाराची जबाबदारीची जाणीव करून देण्यात यावी, सोबतच त्यांना एक शपथ देण्यात यावी अशी अपेक्षा असते. याच उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सांगण्यात आली.

**प्रा. डॉ. नागेश गायकवाड**
**राज्यशास्त्र विभागप्रमुख**

## वाणिज्य विभाग अहवाल

शिक्षण प्रसारक मंडळाचे स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयात दरवर्षी वाणिज्य व संगणक मंडळाची स्थापना केली जाते आणि या मंडळामार्फत विद्यार्थ्यांसाठी अनेक मार्गदर्शन कार्यक्रम, रोजगार संबंधित कार्यक्रम, बँक प्रशिक्षण, तसेच इंटर्नशिप कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन विभागामार्फत केले जाते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंडळाद्वारे खालील प्रवाहाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

(1) **वाणिज्य व संगणक मंडळाचे गठण आणि वित्तीय साक्षरता कार्यशाळेचे आयोजन**

**दिनांक २१ऑगस्ट ,२०२५** रोजी वाणिज्य व संगणक मंडळातर्फे महाविद्यालय व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज यांच्या संयुक्त विद्यमानाने **वित्तीय साक्षरता कार्यशाळेचे** विद्यार्थ्यांकरिता आयोजन करण्यात आले .या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड तसेच एन. एस. इ .या दोन जागतिक संस्थेचे अधिकृत सिक्युरिटीज मार्केट ट्रेनर व प्रा. डॉ.प्रशांत पिसोळकर हे उपस्थित होते. डॉ. प्रशांत पिसोळकर यांनी या वित्तीय साक्षरता कार्यशाळेमध्ये अत्यंत सोप्या व प्रभावशाली पद्धतीने पैसा म्हणजे काय आर्थिक साक्षरतेचे आधारस्तंभ कोणते आहेत. तसेच उत्पन्न, खर्च, कर्ज बजेट, बचत, गुंतवणूक, गरजा, इच्छा व महत्त्वाकांक्षा यांचे संतुलन कसे करायचे हे सविस्तर स्पष्ट केले.

माणसांनी आपला आर्थिक बजेट तयार करताना 50 - 30 - 20 या नियमाचे पालन कसे करावे हे उदाहरणासह स्पष्ट केले. त्याच पद्धतीने बचत म्हणजे काय गुंतवणूक म्हणजे काय? बचत आणि गुंतवणूक का करावी? त्याच पद्धतीने गुंतवणुकीचे तत्त्वज्ञान कोणते व जोखीम परतावा याचे सूत्र सुद्धा सविस्तर स्पष्ट करून सांगितले. आपण जमा केलेला पैसा हा कशा पद्धतीने गुंतवावा याचा आलेख त्यांनी सांगितला. आपल्या गुंतवणुकीवर जास्तीत जास्त परतावा कसा मिळेल याकरिता चक्र वाढ व्याज याचे उदाहरण देऊन त्यांनी स्पष्ट केले. आपण आपला पैसा वित्तीय बाजारात गुंतवत असताना कोणती काळजी घ्यावी याबाबतीत सखोल असे मार्गदर्शन यावेळेस त्यांनी केले. वित्तीय बाजारातून गुंतवलेल्या पैशातून परतावा मिळवण्यासाठी श्रद्धा आणि सबुरी आपल्याकडे असले पाहिजे हेही त्यांनी यावेळी सांगितले.

आपले आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या आर्थिक विकल्प ची माहिती त्यांनी यावेळी दिली यामध्ये भारतीय वित्त बाजार तसेच प्राथमिक बाजार दुय्यम बाजार याविषयी माहिती दिली. दुय्यम बाजारांमधील शेअर मार्केट याबाबतीत माहिती देताना भारतामध्ये असलेल्या दोन महत्त्वपूर्ण बी एस इ आणि एन एस इ या दोन मार्केटची माहिती त्यांनी या वेळेस सांगितले सेन्सेक्स आणि निफ्टी कसे ठरतात तसेच बुल आणि बियर यामध्ये काय फरक आहे या संदर्भातील सुद्धा माहिती त्यांनी मार्गदर्शन करताना दिली. शेअर मार्केटमध्ये पैसा कमवायचा असेल तर जगामध्ये लोकप्रिय असलेल्या म्युच्युअल फंडामध्ये आपण गुंतवणूक करावी ती कशी फायदेशीर आहे याबाबतीत स्पष्ट केले तसेच सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन कसा असला पाहिजे याची सुद्धा मार्गदर्शन केले. गुंतवलेला पैसा सुरक्षित राहावा यासाठी सेबीच्या माध्यमातून निर्माण केलेल्या सारथी ॲप तसेच विविध वेबसाईटची सुद्धा त्यांनी माहिती दिली

याप्रसंगी वाणिज्य मंडळाचे प्रमुख डॉ. अनिल पुरोहित यांनी विद्यार्थ्यांना या संपूर्ण माहितीचा अभ्यास करून आपण समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे असे आव्हान केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ.विजय वाकोडे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गव्हाणे सर यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना भविष्यात या वित्तीय कार्यशाळेमधून प्राप्त झालेल्या माहितीचा निश्चितच फायदा होईल त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ही माहिती आपल्या पालकांपर्यंत पोहोचवावी आणि आपल्या पालकांना याविषयी जागरूक करावे असे आवाहन केले.

**या मार्गदर्शन कार्यक्रमानंतर मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. ती खालील प्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| (१) कु. शर्वरी गजानन कुलकर्णी | वाणिज्य अंतिम वर्ष | अध्यक्ष |
| (२) कु. कोमल सुनील जाधव | वाणिज्य अंतिम वर्ष | उपाध्यक्ष |
| (३) कु. लक्ष्मी प्रदीप नाके | वाणिज्य द्वितीय वर्ष | सचिव |
| (४)कु. शितल संतोष शहाणे. | वाणिज्य द्वितीय वर्ष | सहसचिव |
| (५) कु. कीर्ती श्रीराम खरात. | वाणिज्य द्वितीय वर्ष | कोषाध्यक्ष. |
| (६) अभिजीत देविदास वाघ | वाणिज्य अंतिम वर्ष | प्रसिद्धी प्रमुख |
| (७) निलेश नामदेव मुरादकर | वाणिज्य प्रथम वर्ष. | सदस्य |
| (८) प्रणव विजय खराडे | वाणिज्य प्रथम वर्ष | सदस्य |
| (९) रोशन केशव इंगळे | वाणिज्य प्रथम वर्ष | सदस्य |
| (१०) कु. कल्याणी सचिन महाले | वाणिज्य वित्तीय वर्ष | सदस्य |
| (११) कु. काजल सुभाषचंद्र मिसाळकर | वाणिज्य प्रथम वर्ष | सदस्य |

**(2) राजेशकुमार यांना पी.एच.डी.पदवी -**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत शिक्षण प्रसारक मंडळाचे स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोध न केंद्रात प्रवेशित विद्यार्थी डॉ. राजेश कुमार यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची पीएच.डी. पदवी **दि.25 ऑगस्ट 2025** रोजी मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल पुरोहित यांच्या मार्गदर्शनात प्राप्त झाली.

राजेश कुमार यांचा पीएच डी.चा विषय "CRITICAL STUDY OF FINANCIAL INCLUSION AND INSURANCE PENETRATION AMONG LOW INCOME LABOURS OF WESTERN VIDHARBHA REGION "हा होता.या मधे राजेश कुमार यांनी कमी उत्पन्न असलेल्या कामगाराचा आर्थिक बाबीचा व विमा विषयक प्रवृत्ती चा संपूर्ण आढावा घेऊन यावर आपले संशोधन पुर्ण केले.महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्रात ते 1सप्टेबंर 2022 पासुन प्रवेशीत होते.त्यांनी कमी कालावधीत संशोधन कार्य पुर्ण करुन महाविद्यालयाचा लौकिक वाढवला.

तसेच मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल पुरोहित यांच्या मार्गदर्शना खाली या पुर्वीही प्राध्यापिका डॉ.प्रिती प्रेमराज भाला व प्रा.डॉ. सुमित राजेन्द्र गिनोडे अश्या दोन विद्यार्थ्यांनी पीएच.डी.डिग्री प्राप्त केलेली आहे. महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्राच्या या यशा बद्दल मार्गदर्शक प्रा.डॉ . अनिल पुरोहित व संशोधक विद्यार्थी राजेश कुमार या दोघांचेही शि.प्र.मं. चे अध्यक्ष रामकृष्ण दादा शेटे ,सचिव प्रेमराजजी भाला व समस्त शि.प्र.मं.संचालक मंडळ , प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे, व समस्त प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून अभिनंदन करण्यात आले.

**(3) पंडित दीनदयालजी उपध्याय जयंती संपन्न-**

दि. 25 सप्टेंबर 2025 रोजी महाविद्यालयात पंडित दीनदयाल जी उपाध्याय यांची जयंती संपन्न झाली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे तर कार्यक्रम प्रमुख प्रा.डॉ. अनिल पुरोहित उपस्थित होते.यावेळी प्राचार्य व प्राध्यापक यांचे हस्ते पंडित जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर प्रा.डॉ.केदार ठोसर यांनी पंडित दिनदयाजी यांच्या राजकीय व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. तसेच प्रा.मनिष पालवे यांनी सुध्दा पंडीतजीच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.दिलीप महाजन यांनी सुत्र संचालन व आभार प्रदर्शन केले. यानंतर उपस्थित सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थ्यांनी पंडितजींना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. .

**(4)वाणिज्य क्षेत्रात रोजगाराच्या संधी कार्यशाळा**

दि.12फेब्रुवारी,2026 रोजी वाणिज्य क्षेत्रात रोजगाराच्या संधी या विषयावर निलया फाउंडेशन पुणे आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बेबीनारचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे उपस्थित होते. वेबिनार च्या वेळी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थी व प्राध्यापक बंधूंना निलया फाउंडेशन पुणे येथील संचालिका कु.रूनाल मॅडम यांनी वाणिज्य क्षेत्रात रोजगाराच्या संधी या विषयाच्या आधारे वाणिज्य क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग कसा होतो याबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने आर्टिफिशल इंटेलिजन्स म्हणजे काय? अकाउंटिंग फायनान्स मध्ये ए आय चा उपयोग कसा होतो तसेच ऑटोमॅटिक डाटा एन्ट्री, इन्व्हाईस चेकिंग, बँक रिकाउन्सिलेशन, आणि फायनान्शिअल रिपोर्ट जनरेट कशी होते याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

**(5) एस.पी.एम.वाणिज्य विभागाची इंडस्ट्रियल व्हिजिट.**

शिक्षण प्रसारक मंडळाचे स्वर्गीय तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य विभागाकडून प्राचार्य, डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या मार्गदर्शनात विभागातील विद्यार्थी , विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल पुरोहित व प्रा. डॉ.बाळकृष्ण इंगळे यांनी गुरुवार दि.२६, फेब्रुवारी 2026 ला चिखली एम . आय . डी .सी. परिसरातील तिरुपती जिनिंग अँड ऍग्रो इंडस्ट्री, यश उद्योग तसेच अंश बेकरी, या उद्योगाला भेटी दिल्या.

सर्वप्रथम **तिरुपती जिनिंग अँड ऍग्रो इंडस्ट्रीज** या उद्योगाला भेट दिली या भेटीत उद्योगाचे मालक श्री गोंविदसेठ अग्रवाल व श्रीअनुपसेठ अग्रवाल आणि कर्मचारी या सर्वानी कापुस खरेदि पासून जिनिंग प्रक्रिये पर्यंतची इत्यंभूत माहीती विद्यार्थ्यांना देऊन कापसाचे भाव ठरविण्यासाठी स्टेपल काढणे, मॉइश्चर व मातीचे प्रमाण कसे काढतात इत्यादीची प्रत्यक्ष कृती करून दाखविली व विद्यार्थ्यांना स्टेपल काढणे सुध्दा शिकवले .अश्या प्रकारे विद्यार्थांनी संपूर्ण उत्पादन प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच यानंतर **यश उद्योगालाला** भेट दिली. या ठिकाणी श्री मनीषसेठ अग्रवाल यांनी फुटाणे बनविण्याच्या प्रक्रियेची माहिती दिली. यामध्ये कच्च्या मालाची खरेदी व गुणवत्ता तसेच उत्पादन, हीटिंग व विक्री इत्यादी संबंधी सखोल माहिती त्यांचे कडून घेण्यात आली .

शेवटी **अंश बेकरी** ला भेट दिली.बेकरी उद्योगाचे मालक श्री अमित उर्फ रामसेठ गिनोडे व श्रीमती गवई मैडम व तेथील कामगारांनी केक व बेकरी प्रॉडक्ट कसे तयार होतात आणि त्याची गुणवत्ता व गुंतवलेल्या भांडवला संबंधीची संपुर्ण माहिती दिली प्रत्येक उद्योगाच्या भेटीनंतर उद्योग मालकांनी आपल्या उद्योगातील उत्पादनाचे सॅम्पल प्रत्येक विद्यार्थ्यांना दिले. व या अध्ययनाचा विद्यार्थ्यांना भविष्यात उद्योग स्थापनेत निश्चितच मदत होईल असे या सर्व उद्योग मालकांनी आपल्या संभाषणातून सांगितले.प्रत्येक उद्योगाच्या भेटीनंतर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. अनिल पुरोहित व प्रा. डॉ. बाळकृष्ण इंगळे यांनी उद्योगाचे मालक श्री गोविंद सेठ अग्रवाल, श्री अनुप सेठ अग्रवाल, श्री पवन सेठ अग्रवाल , आणि श्री अमित सेठ गिनोडे यांचे आभार मानून भविष्यात सुद्धा असे सहकार्य द्याल अशी अपेक्षा विभागाच्या वतीने करण्यात आली.

**(6) श्री अंबिका अर्बन येथे बँक प्रशिक्षण कार्यशाळा -**

गुरुवार दि. 5 मार्च ला शिक्षण प्रसारक मंडळाचे स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी, श्री अंबिका अर्बन मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी लिमिटेड चिखली येथे श्री अंबिका अर्बनच्या अध्यक्षा सौ.डॉ. संध्याताई कोठारी आणि ज्येष्ठ संचालक ॲडवोकेट विजयजी कोठारी यांच्या मार्गदर्शनात व प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे यांच्या प्रयत्नातून एकदिवसीय बँक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली वाणिज्य शिक्षण व व्यवहारिक शिक्षण यांचा सहसंबध जोडण्यासाठी महाविद्यालयाचा वाणिज्य विभाग दरवर्षी बँक प्रशिक्षण कार्यशाळा,औद्योगिक स्थळांना भेटी , सि.ए.कार्यालयात किंवा बॅकेत इंटर्नशिप कार्यक्रम , प्लेसमेंट ॲक्टीव्हिटी आणी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो.

कार्यशाळेत सर्वप्रथम अंबिका अर्बन संस्थेचे माजी अध्यक्ष व जेष्ठ संचालक ॲड.विजयजी कोठारी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन राउत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रामदास शिंदे , राहुल चव्हाण , संस्थेचे कर्मचारी शरद लंबे, राहुल सपकाळ व सौ अलकाताई लहाने यांचे स्वागत करण्यात आले . स्वागता नंतर बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बँकेतील सर्व व्यवहाराची माहीती दिली. या मधे खाते उघडणे, कर्ज,मनी ट्रांसफर, कृषी मालावर कर्ज सुविधा, आर.टी.जि.एस. सोने तारण कर्ज़, लॉकर सुविधा इत्यादि माहीतीचा समावेश होता. या नंतर बँकेतील सर्व व्यवहारासाठी लागणारे आवश्यक ती सर्व कागद पत्रे विद्यार्थ्याकडुन भरून घेण्यात आली. व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे बँकेच्या अधीकारी वर्गाकडून देण्यात आली. कार्यशाळेच्या शेवटी बँकेचे अध्यक्ष , सर्व संचालक तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे विभागाच्या वतीने आभार मानन्यात आले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परीचय प्रा.डॉ.बाळकृष्ण इंगळे, सुत्र संचालन प्रा. डिगांबर मेहेत्रे व आभार विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिल पुरोहित यांनी मानले.

**(7) कु.मोनिका अशोक चांडक ह्या संशोधिकेला पीएच.डी.पदवी**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत शिक्षण प्रसारक मंडळाचे स्व. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्रात प्रवेशित विद्यार्थीनी कु. मोनिका अशोक चांडक यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची पीएच.डी. पदवी दि.10 एप्रिल ,2026 रोजी मार्गदर्शक प्रा. डॉ.अनिल पुरोहित यांच्या मार्गदर्शनात प्राप्त झाली.

"A CRITICAL STUDY OF INFORMATION SECURITY PRACTICES ADOPTED BY PUBLIC AND PRIVATE SECTOR BANKS IN WESTERN VIDARBHA REGION".

कु.मोनिका चांडक यांचा पीएच डी.चा विषय "हा होता.या मधे खाजगी बँक आणि सार्वजनिक बँका मध्ये बँकेतील माहितीची सुरक्षा करण्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे त्या संबंधित अभ्यास करून त्यातील उनिवा व त्या पद्धतीचे महत्त्व विशद केले. महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्रात ते 1सप्टेबंर 2023पासुन प्रवेशीत होते.त्यांनी कमी कालावधीत संशोधन कार्य पुर्ण करुन महाविद्यालयाचा लौकिक वाढवला.

तसेच मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल पुरोहित यांच्या मार्गदर्शना खाली या पुर्वीही प्राध्यापिका डॉ.प्रिती प्रेमराज भाला व प्रा.डॉ. सुमित राजेन्द्र गिनोडे आणि राजेश कुमारअश्या तिन विद्यार्थ्यांनी पीएच.डी.डिग्री प्राप्त केलेली आहे. महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्राच्या या यशा बद्दल मार्गदर्शक प्रा.डॉ . अनिल पुरोहित व संशोधक विद्यार्थीनी कु.मोनिका अशोक चांडक या दोघांचेही शि.प्र.मं. चे अध्यक्ष रामकृष्ण दादा शेटे ,सचिव प्रेमराजजी भाला व समस्त शि.प्र.मं.संचालक मंडळ , प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे, व समस्त प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून अभिनंदन करण्यात आले.

(8) **पीएच .डी. रजिस्ट्रेशन**-- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती पीएच.डी.सेल च्या अंतर्गत विद्यापीठत दि. 14-11-2025 ला RRC संपन्न झाली. व यामध्ये खालील प्रमाणे तीन संशोधकांचा वाणिज्य विषयाचा संशोधन आराखडा मंजूर झाला. व त्यांना दि.01-09-2025 पासून संशोधन करण्याची परवानगी मिळाली ते संशोधक खालील प्रमाणे-

(1) **कु.कोमल कमलकिशोर बाहेती**
(2) **कु.सीमा श्रीकृष्ण खेंडकर**
(3) **अनिल हर्षवर्धन मापारी.**

(9) **पीएच.डी. कोर्स वर्क साठी प्रवेश**-

सत्र 2025-2026 साठी खालील तीन विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चित करण्यात आले. ते पुढील प्रमाणे

(1) **दीपक जाणु चव्हाण**
(2) **कु.गौरी जगदीशप्रसाद जोशी**
(3) **कु.शाहीन घासी नंदावले**

वरील प्रमाणे तीन विद्यार्थ्यांचा पीएच.डी. कोर्स वर्क साठी प्रवेश निश्चित करण्यात आला.
वरील प्रमाणे वाणिज्य विभागा मार्फत शैक्षणिक वर्ष 2025-2026 मध्ये कार्यक्रम संपन्न् झाले.

**( प्रा.डॉ.बाळकृष्ण इंगळे )**

**( प्रा.डॉ.अनिल पुरोहित )**
वाणिज्य विभाग प्रमुख

## अँटि रॅगिंग समिती अहवाल

शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये रॅगिंग बाबत एकही तक्रार प्राप्त झाली नाही.

## महिला लैंगिक छळ प्रतिबंध समिती अहवाल

शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये महिला लैंगिक छळा बाबत एकही तक्रार प्राप्त झाली नाही.

## प्लेसमेंट अँड करिअर कौन्सलिंग सेल अहवाल

- दिनांक 23 जानेवारी 2026 रोजी क्रुत्रीम बुध्दिमत्ता या विषयावर कार्यशाळा
- दिनांक 4 फेब्रुवारी ते 07 फेब्रुवारी या कालावधीमध्ये विद्यापीठ स्तरीय कौशल्य विकास कार्यशाळा
- 

**प्रा.डॉ उल्हास वि.ब्रम्हे**
**समन्व्यक**

## महिला सक्षमीकरण कार्यशाळा व निबंध स्पर्धा

शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय महिला विकास कक्ष,स्व ,सु.रा.चुनावाले आयुर्वेद महाविद्यालय व भारतीय स्त्री शक्ती यांच्या संयुक्त विद्यामाने *महिला सक्षमीकरण कार्यशाळा व निबंध स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला.महिला सक्षमीकरण काळाची गरज या विषयावर वक्ते प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई यांनी - भारतीय समाज सक्षम घडवायचा असेल महिलांना समानतेचा दर्जा देवूनच समाजाचा विकास होवू शकतो.संविधानाने दिलेले अधिकार समजून घेतले पाहीजे.शिवराया ,फुले,शाहू , आंबेडकर अश्या महामानवाना जो पर्यत आपण आपले आदर्श मानत नाही तो पर्यत आपला प्रगतीचा मार्ग सुकर होत नाही असे प्रतिपादन केले.पुढे ते म्हणाले कि आपल्या देशात महिलांना देवी किंवा दासी म्हणून स्विकारल तिला व्यक्ति म्हणून स्विकारणे देशाच्या हिताच आहे.तीच्या सहभागातून देशाची प्रगती होवू शकत असे मत व्यक्त केले.महिला सक्षमीकरण कार्यशाळा व बक्षीस वितरण सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष स्व.सु.रा.चुनावाले महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.जोत्स्ना गुल्हाने ,तर प्रा.डॉ.दिलीप महाजन ,डॉ.ज्योती खरात,हेल्थ कोच सौ.माया लड्ढा, प्रा.डॉ.विजय वाकोडे अधिक्षक पवन लड्ढा,कु सोनाली तुपकर विचारमंचावर विराजमान होते.सुरूवातीला राष्ट्रमाता जिजाऊ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन झाले.पाहुण्याचा प्रास्ताविक परिचय प्रा.डॉ.विजय वाकोडे यांनी करून दिला.

महिला सक्षमीकरण या विषयावर निबंध स्पर्धेत १४८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.त्यातून प्रथम क्रमांक कु श्रावणी गणेश साळवे ,द्वितीय क्रमांक कु जानव्ही राजेन्द्र तेल्हारकर,तृतीय क्रमांक सनिका रमेश नायसे हिने पटकविला .तर प्रोत्साहन पर पुरस्कार देवून तनिष्का चांदने व तणूजा इघवे यांना सन्मानचिन्ह व पुस्तके देवून गौरविण्याच आले.या प्रसंगी ग्लोबल फाऊनडेशनी सन्माननीत *आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रा.विजय वाकोडे तर आदर्श ग्रंथपाल पुरस्कार पुरस्कार प्राप्त डॉ.प्रदिप बारड यांचा सत्कार करण्यात आला.यानंतर सौ.माया लड्ढा यांनी महिला व पोषण आहार यावर प्रात्यक्षीकासह व्याख्यान संपन्न झाले. बक्षीसे प्रायोजीत केल्याबद्दल प्रा.डॉ.प्रदीप बारड,प्रा.अरविंद घ्याळ,प्रा.संतोष काळे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.अध्यक्षीय मनोगत डॉ.जोत्स्ना गुल्हाणे यांनी व्यक्त केले तर सुत्रसंचालन कु.अश्विनी माळी हिने केले.या कार्यक्रमाला आयुर्वेदिक तथा एस.पी.एम महाविद्यालयाचे शिक्षक,कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

**प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई**

**समन्वयक,महिला विकास कक्ष**

* * * * * *

## दीक्षांत समारंभ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आदेशान्वये दि.२४ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयात सत्र २०२३-२० या सत्रात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभात पदवी देवून गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. रामकृष्णदादा शेटे अध्यक्ष शि.प्र.मं. चिखली तर प्रमुख अतिथी उपस्थि होते. तसेच रंगमंचावर प्रा.डॉ. नागेश गायकवाड, प्रा. डॉ. अनिल पुरोहित, प्रा. डॉ. सुभाष राऊत, प्रा. डॉ. सुरेश माळशिखरे प्रा.डॉ. विजय वाकोडे, प्रा.डॉ. बाळकृष्ण इंगळे, प्रा. डॉ. उल्हास ब्रम्हे, प्रा. मनिष पालवे उपस्थित होते. यावेळी अंत्य व कला व अंत्य वर्ष वाणिज्य मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

**डॉ. प्रफुल्ल उ. गवई**
**समन्वयक**

# IQAC अहवाल

जुन 2004 पासून आपल्या महाविद्यालयात IQAC ची स्थापना झाली आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी ही समिती सातत्याने प्रयत्न करत आहे. आतापर्यंत या समितिच्या नेतृत्वात आपल्या महाविद्यालयाने नॅक मूल्यांकनाची 2004 ला पहिली सायकल, 2015 ला दुसरी सायकल व 2024 ला तिसरी सायकल पूर्ण केलेली आहे.

सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन करण्यासाठीच्या चौथ्या सायकलच्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत. उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आलेले आहे. त्याअनुषंगाने नॅक ऑफिस बेंगलोर कडून दोन वर्षापासून नवीन गाईडलाईन देण्याचे ठरविले आहे. परंतु अद्यापही त्यांच्या मार्फत गाईडलाईन प्रकाशित झालेल्या नाहीत. तरीसुद्धा मागील दोन वर्षापासून आपले महाविद्यालय गुणवत्ता वाढीसाठी व नवीन शैक्षणिक धोरणात सहभाग घेऊन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. आपल्या महाविद्यालयाचा सत्र – 2024-25 चा वार्षिक गुणवत्ता अहवाल (AQAR) आपण माहितीसह तयार करून ठेवला आहे. परंतु नॅक ऑफिस कडून पोर्टल बंद असल्याकारणाने तो आपण अपलोड करू शकलो नाही. तीच परिस्थिती सत्र – 2025-26 ची सुद्धा आहे. जेव्हा नॅक ऑफिस मार्फत पोर्टल उपलब्ध करून दिले जाईल, तेव्हा आपण तो पोर्टलवर अपलोड करणार आहोत.

महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी IQAC मार्फत महाविद्यालयातील विविध विभागांना सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन गुणवत्ता पूर्ण कार्यक्रम घेण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जातात. त्याला महाविद्यालयातील विभाग उत्तम प्रतिसाद देत आहेत. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपण दरवर्षी महाविद्यालयाच्या उपक्रमांचा प्रतिबिंब या नावाने अहवाल तयार करत असतो. तो आतापर्यंत आपण मराठीमध्येच करायचो, आता मागील दोन वर्षापासून आपण मराठीसह इंग्रजीमध्ये सुद्धा तयार करत आहोत. त्याचा फायदा आपल्याला नॅक करत असताना विविध डॉक्युमेंट, बाह्य समितीला दाखविण्यासाठी होणार आहे.

**सत्र 2025-26 मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी IQAC समितीच्या वतीने पुढील उपक्रम घेण्यात आले.**

1) **निसर्गोपचार द्वारे मानसिक स्वास्थ व आरोग्याची काळजी** -

सांगली येथील निसर्गोपचार केंद्राचे डॉ. वाकळे यांनी उपस्थित राहून आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निसर्गोपचारद्वारे मानसिक स्वास्थ्य आणि आरोग्य चांगले कसे ठेवायचे यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले होते. निसर्गोपचारातील अनेक प्रकारचे घरगुती औषधांचा वापर कसा करायचा याचा सविस्तर आढावा त्यांनी दिला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाषजी गव्हाणे सर हे उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन IQAC समन्वयक प्रा. डॉ. नागेश गायकवाड यांनी तर आभार सह-समन्वयक प्रा. डॉ. विजय वाकोडे यांनी मानले.

2) **सामाजिक संशोधन पद्धतीतील नवीन प्रवाह** -

श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे. येथील प्रा.डॉ.शैलेश त्रिभुवन, मराठी विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य यांचे सामाजिक संशोधन पद्धतीवरील नवीन दृष्टिकोन या बद्दल मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. त्यांनी सामाजिक संशोधनात नवनवीन पद्धतींचा अवलंब करून नवीन पद्धतीने संशोधन कसे करावे यासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले. स्वानुभवातील संशोधन पद्धती सुद्धा सांगितल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन IQAC समन्वयक प्रा.डॉ.नागेश गायकवाड यांनी केले, तर आभार मराठी विभागाचे प्रा. डॉ.प्रफुल्ल गवई यांनी मांनले.

## पालक संपर्क व पालक मेळावा समिती अहवाल

शैक्षणिक सत्र 2025 -26 मध्ये ऑक्टोबर 2025 व फेब्रुवारी 2026 या दोन महिन्यांत पालक संपर्क केला गेला व आपापल्या वर्गांचा स्वतंत्र पालक मेळावा घेण्यात आला. महाविद्यालयाचा व विद्यार्थ्यांच्या पालकांचा प्राध्यापकांशी निकटचा संपर्क प्रस्थापित व्हावा,या उद्देशाने पालक संपर्क अभियान राबवण्यात आले.

शैक्षणिक सत्र 2025-26 मध्ये 286 पालकांशी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने संपर्क करण्यात आला. यात 36 गावांतील पालक वर्ग आणि चिखली शहरातील 18 नगरांचा समावेश होता. या शैक्षणिक सत्रात एकूण 03 पालक मेळावे आयोजित करण्यात आले. यात बी. कॉम . 2 चा पालक मेळावा महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यात 04 पालकांची उपस्थिती होती.

दि.06 एप्रिल 2026 रोजी सोमवार ला ग्राम "भारज "येथे दुपारी 4 वाजता B.A. 1 वर्गांच्या विद्यार्थी व पालक मेळावा सभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान या पालक संपर्क व मेळावा समितीचे प्रमुख प्रा.डॉ. दिलीप पां.महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हा पालक संपर्क व मेळावा पार पडला.या प्रसंगी पालक उपस्थित होते. .या विद्यार्थी व पालक मेळाव्यास 07 विद्यार्थी व 06 पालकांची उपस्थिती लाभली.

दि.08 एप्रिल 2026 रोजी बुधवारला ग्राम "मंगरुळ नवघरे "येथे दुपारी 4 वाजता B.A. 1 वर्गांच्या विद्यार्थी व पालक मेळावा सभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान या पालक संपर्क व मेळावा समितीचे प्रमुख प्रा.डॉ. दिलीप पां.महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हा पालक संपर्क व मेळावा पार पडला.या प्रसंगी पालक उपस्थित होते. .या विद्यार्थी व पालक मेळाव्यास 09 विद्यार्थी व 11 पालकांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी मंचावर उपस्थित प्रा.डॉ. सतिश मोरे यांनी महाविद्यालयाविषयी व महाविद्यालयात चालणाऱ्या विविध उपक्रमांबाबत पालक मेळाव्यास उद्‌बोधित केले.तर अध्यक्ष स्थानावरून संबोधित करताना या कार्यक्रमाचे आयोजक व समन्वयक प्रा.डॉ.दिलीप महाजन यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित पालक व विद्यार्थी वर्गाचे आभार व्यक्त केले.विद्यार्थी व पालक यांच्यासोबत महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचा घनिष्ठ संपर्क प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या पालक मेळाव्यांचे आयोजन दरवर्षी महाविद्यालय विविध गावात व महाविद्यालयात करीत असते. महाविद्यालयातील ग्रंथालय विभागा कडून दिल्या जाणाऱ्या विविध सेवा तसेच महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या विविध स्कॉलरशिप व पुरस्कार ,महाविद्यालयात चालणारे एन.सी.सी.व एन.एस.एस.,स्पोर्टस् सारखे उपक्रम , एम.पी.एस.सी.तसेच जपानी भाषे विषयी मार्गदर्शन, रोजगार मार्गदर्शन, महाविद्यालयातील इतर सोई- सुविधां व महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत माहिती दिली.भविष्यात विद्यार्थ्यांची वाटचाल ही सुलभतेने यशस्वीते कडे असावी, अशी आशा या पालक मेळावा उपक्रमातून निर्माण व्हावी. हा महाविद्यालया मार्फत पालक मेळावा घेण्यामागचा उद्देश होय. पालक मेळाव्याच्या निमित्ताने प्रत्यक्षात विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासोबत हितगुज करण्याची संधी प्राध्यापकांना प्रत्यक्षपणे प्राप्त होते तसेच पालकांनाही आपल्या पाल्ल्यांबाबत उत्तम गुणात्मक माहिती यातून प्राप्त व्हावी. महाविद्यालयाचा संबंध दृढ करण्याचा मानस हेतू महाविद्यालय सतत सिद्ध करत असते .अशा प्रकारे महाविद्यालयाद्वारा आयोजित पालक मेळावे यांची आयोजन विद्यार्थ्यांच्या व गावकऱ्यांच्या साक्षीने यशस्वीपणे पार पडत असते.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक

उन्नतीच्या हेतूने हा पालक संपर्क करण्यात आला.अशा प्रकारे ग्राम शेळगाव आटोळ या ठिकाणी एस.पी.एम. महाविद्यालय व्दारा आयोजित पालक मेळावा गावकऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या साक्षीने यशस्वीपणे संपन्न झाला.

**शिक्षक व पालक मेळावा समिती.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | अध्यक्ष | - | प्राचार्य, डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे. |
| 2. | समन्वयक | - | प्रा. डॉ.दिलीप पांडुरंग महाजन. |
| 3. | सदस्य | - | प्रा.डॉ.सुभाष ग्यानोजी राऊत |
| 4. | पालक प्रतिनिधी | - | श्री.देविदास हरि वाघ (मासरुळ ) |
| 5. | पालक प्रतिनिधी | - | श्री ज्ञानेश्वर दामोदर बोर्डे (शेळगाव आटोळ) |

# पुरस्कार व शिष्यवृत्ती

महाविद्यालयातील गुणवंत, होतकरू व नियमित विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने, महाविद्यालयातर्फे त्यांचे कौतुक व्हावे या उद्देशाने दरवर्षी महाविद्यालयाकडून विविध पुरस्कार व शिष्यवृत्तीचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येते.या 2025 -26 चालु शैक्षणिक सत्रात

दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी स्वातंत्र्यदिनी पुरस्कार वितरण—महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली श्री.मा.रामकृष्णदादा शेटे (अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली) यांच्या शुभहस्ते गुणवंत, अभ्यासू, होतकरू विद्यार्थ्यांना विविध पुरस्कार वितरित करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी विविध विषयात, विविध वर्गात, प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत अशा एकूण 56 विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात रुपये 9,782 /- वितरित करण्यात आली. यांतील रु.6,471/- ही रक्कम विविध सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर दात्यांकडून ठेव स्वरूपात ठेवली गेली असून रू.2,809/- ही रोख रक्कम महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांकडून रोख स्वरूपात प्राप्त होते.कार्यक्रमाचे यशस्वीपणे प्रास्ताविक,परिचय, सूत्र संचालन, नियोजन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ.सतीश मोरे यांनी केले.

दि. 26 जानेवारी 2026 रोजी प्रजासत्ताक दिनी विविध पुरस्कार व शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच श्री.मा. रामदासजी निमावत (संचालक ,शिक्षण प्रसारक मंडळ ,चिखली) त्यांच्या शुभ हस्ते त्यांच्या उपस्थितीत 28 होतकरू, नियमित ,गरीब, गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रु.14,364 /- मात्र रुपयांचे पुरस्कार व शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. यातील रू.6,254/- मात्र रक्कम समाजांतील प्रतिष्ठीत मान्यवरांकडून ठेव स्वरूपात ठेवली गेली असून रोख रक्कम रू.8,110 /- मात्र रक्कम महाविद्यालयातील विविध विषयांतील प्राध्यापकांकडून रोखीच्या स्वरूपात प्राप्त होते.याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मान्यवरांचा परिचय, सूत्र संचालन प्रा.डॉ.सतिष मोरे तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.दिलीप महाजन (समन्वयक, पुरस्कार व शिष्यवृत्ती वितरण समिती) यांनी केले.

या चालु 2025 -26 शैक्षणिक सत्रात महाविद्यालयाकडून एकूण 8 4 गुणवंत हुशार ,गरजु नियमित,होतकरू,अभ्यासू विदयार्थ्यांना एकुण रोख रक्कम रू. 2,4146 /- मात्र पुरस्कार व शिष्यवृत्ती स्वरूपात प्रदान करण्यात आली.

**समन्वयक,**
**प्रा.डॉ.दिलीप पांडूरंग महाजन,**
**पालक संपर्क व मेळावा समिती**

## मुक्त विद्यापीठ अहवाल

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यताप्राप्त आणि महाराष्ट्र शासनाच्या विधिमंडळात पारित झालेल्या कायद्याने स्थापन झालेल्या, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मुक्तविद्यापीठ असून कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग कॅनडा या आंतरराष्ट्रीय संस्थेने गौरविलेले विद्यापीठ आहे.

पृथ्वी फिरत आहे जगधावते आहे आणि घड्याळयाच्या काट्यावर आणि प्रत्येक व्यक्ती सुद्धा धावत आहे, जगण्यासाठी शिक्षण घेण्यासाठी प्रगती करण्यासाठी आणि यशाचे शिखर काबीज करण्यासाठी जीवाचे रान करून पळतो आहे, कधी त्याला हवा असलेल्या त्याच्या वाटा भेटतात तर कधी तो नुकताच पुढे आलेल्या वाटेवरून चालू लागतो, आयुष्यात पाहिलेली आणि पडलेली स्वप्ने आणि महत्वकांक्षा पूर्ण होतातच असे नाही, पण जीवन मात्र पुढे पुढे चालले असते ते प्रत्येकाला कधी हसवतात तर कधी रडवतं संपूर्ण समाज सुशिक्षित झाला पाहिजे जीवनातील अंधार दूर होऊन समाजातील प्रत्येक घटक आकडे प्रकाश पोहोचला पाहिजे या उद्देशाने महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

या अभ्यास केंद्रावर **बी.ए., बी. कॉम., एम. ए. मराठी व इतिहास, एम. कॉम.** हे अभ्यासक्रम राबविले जातात. केंद्रप्रमुख म्हणून प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे हे काम पाहतात, केंद्रसंयोजक म्हणून प्रा. डॉ. नागेश गायकवाड, तर केंद्र सहाय्यक म्हणून श्री भागवत झगरे व श्री सुरेश कांबळे हे काम पाहतात.

**प्रा.डॉ. नागेश गायकवाड, समन्वयक**

**मतदान जन जागृती गीत - (चाल - आये हो मेरी जिंदगी में तुम बहार बनके)**

मतदान आपला हक्क, सगळे मिळून करूया...२
संविधानातील मूल्य.... हो ss २
अंगी जतन करूया...
मतदान आपला हक्क,
सगळे मिळून करूया..
जगतात भारताचा अभिमान वाढवूया ..२
संविधानातील मूल्य.... हो ss २
अंगी जतन करूया...
मतदान आपला हक्क,
सगळे मिळून करूया.. ll ध्रू ll
राजा असो की रंक..मताचे मूल्य एक....२
लोकशाहीच्या रूपाने, घेऊया मुक्त श्वास...
गुलामी तोडण्याचा, आहे हा राजमार्ग....२
संविधानातील मूल्य....हो ss २
अंगी जतन करूया..
मतदान आपला हक्क, सगळे मिळून करूया... ll १ ll
पैशाच्या मोहापाई, स्वाभिमान विकू नका ...२
खाण्या नि पिण्यासाठी ,
गहाण होऊ नका..
मत मुक्तीचे हे साधन, मीठ मिरची नाही बरं....२
संविधानातील मूल्य.... हो ss २
अंगी जतन करूया..
मतदान आपला हक्क, सगळे मिळून करूया.....ll२ll

**प्रा. डॉ. विजय सावित्री कुंडलिक वाकोडे**

## महाविद्यालय गौरव

### निवड - यशवंतांचे अभिनंदन!



**प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण
महाराष्ट्र शासन व सामाजिक न्याय विभाग
२०२५-२६



**प्रा. डॉ. उल्हास विजय ब्रह्मे**

आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार
२०२५-२६



**प्रा. डॉ. प्रदिप बारड**

राष्ट्रीय उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार
२०२५-२६



**प्रा. डॉ. विजय वाकोडे**

राष्ट्रीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार
२०२५-२६

# महाविद्यालय गौरव

## निवड - यशवंतांचे अभिनंदन!



दिपक पैठणे
बी.एस.एफ.



गजानन डब्बे
सिमा सुरक्षा बल

अभ्यास मंडळाच्या अंतर्गत घेतलेल्या विविध कार्यक्रमांचे फोटो

वाणिज्य व संगणक मंडळ





इंडस्ट्री भेट



वितीय साक्षरता कार्यशाळा



बँक प्रशिक्षण




इंटर्नशिप प्रोग्राम



गोविंदा वाळेकर
बी.एस.एफ.



भगवान तेलंग्रे
बी.एस.एफ.



सैय्यद बिलाल
ड्रिलमध्ये सिलव्हर मेडल



साधना जोरवाल
ड्रिलमध्ये गोल्ड मेडल



पूनम संजय देशमुख
आंतरमहाविद्यालयीन
ॲथलेटिक स्पर्धेत कास्य पदक

## आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थी



डॉ. स्वाती योगेश मते (ग्रंथालय)
(मार्गदर्शक : डॉ.प्रदिप हिम्मतराव बारड)



डॉ. राजेशकुमार (वाणिज्य)
(मार्गदर्शक : डॉ.अनिल सत्यनारायण पुरोहित)



डॉ. मोनिका चांडक (वाणिज्य)
(मार्गदर्शक : डॉ.अनिल सत्यनारायण पुरोहित)



डॉ. अभिजित झाडे
(मार्गदर्शक : डॉ.प्रफुल्ल गवई)

## मराठी व इंग्रजी अभ्यास मंडळ



निबंध स्पर्धा



ब्रिज कोर्स

### इतर कार्यक्रम



मानसिक स्वास्थ्य कार्यशाळा



महिला सक्षमीकरण कार्यशाळा



अंमली पदार्थ विरोधी शपथ



पुरस्कार व शिष्यवृत्ती वितरण



वंदे मातरम १५० वर्षे - नाटिका सादरीकरण



मराठी भाववाचन स्पर्धेत सहभाग

## इतिहास अभ्यास मंडळ छायाचित्रे



डॉ.मनोज सोनुने मार्गदर्शन करतांना



प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे मार्गदर्शन करतांना





डॉ. सुरेश माळशिखरे मार्गदर्शन करतांना

## स्नेह संमेलन







जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धा



युथ फेस्टिवल अमरावती (रांगोळी व मेहंदी स्पर्धा)

## राज्यशास्त्र अभ्यास मंडळ



मतदार जनजागृती



राष्ट्रीय मतदार दिन - शपथ






राष्ट्रीय माहिती अधिकार दिन

## अर्थशास्त्र व इतिहास अभ्यास मंडळ




जागतिक लोकसंख्या दिन



अतिथि व्याख्यान

## विद्यार्थी विकास मंडळ / सांस्कृतिक विभाग

### स्नेह संमेलन









## राष्ट्रीय सेवा योजना (NSS)













NSS श्रमदान



गोदरी ग्राम NSS शिबीर



NSS शिबीर व्याख्यान



मा. दादांचे उद्घाटनपर मार्गदर्शन


पूज्य पुरूषोत्तम दारव्हेकर स्मृती
मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धा
प्राथमिक फेरी-चिखली केंद्र










GPS Map Camera
Check In
Chikhli, Maharashtra, India
86vx+pm2, Nagsem Buddha Nagar, Chikhli,
Maharashtra 443201, India
Lat 20.34422° Long 76.249403°
Monday, 12/01/2026 10:54 AM GMT +05:30
Google



## महाविद्यालयातील विशेष उपक्रम



पारिवारिक मेळावा - दि. 16 जून 2025



दीपोत्सव - 2025



गणेशोत्सव 2025

## अभिनंदन



नवनियुक्त प्राचार्यांचे अभिनंदन करतांना मान्यवर (10 ऑक्टोबर 2025)



महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार



राष्ट्रीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार



राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार



आदर्श क्रीडा शिक्षक गौरव पुरस्कार

## क्रीडा विभाग





आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा





सॉफ्ट स्किलवर आयोजित विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा



अंतर्वर्गीय क्रॉस कंट्री स्पर्धा



आंतरराष्ट्रीय योगा दिन



तलवारबाजी स्पर्धा

## इतर कार्यक्रम





मतदार जनजागृती



संविधान दिन



झेंडा वंदन करतांना मा.संचालक श्री. निमावतदादा



15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन



26 जानेवारी गणराज्य दिन



कुष्ठरोग निवारण शपथ



सामाजिक प्रबोधन पथनाट्य

# अभिनंदन




यशवंतांचे अभिनंदन करतांना मा. सचिव प्रेमराजजी भाला व संचालक मा.रामदासजी निमावत आणि मा. सुनीलजी लाहोटी







पदवीदान समारंभ







ए डी सायंटिफिक इंडेक्स मध्ये डॉ. प्रदीप बारड यांची SGBAU मधून 49 वी RANK





छत्रपती शिवाजी महाराज जयंती